नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५० * अंक ३४६ * * अमरावती * गुरुवार, दिनांक १२ जून २०२५ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त


## शरद पवारांनी मानले नरेंद्र मोदींचे आभार

■ **वृत्तसंस्था, अहिल्यानगर, दि. ११ :**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना भेटण्यासाठी सुप्रिया सुळे गेल्या असता, मोदींनी शरद पवार यांच्या तब्येतीची विचारपूस केली असल्याची माहिती समोर आली होती. पंतप्रधानांनी माझ्या तब्येतीची विचारपूस केल्याबद्दल मी त्यांचा आभारी असल्याचे शरद पवार यांनी म्हटले आहे.

या संदर्भात शरद पवार यांनी दोनच शब्दात पंतप्रधानांनी केलेल्या चौकशी बद्दल आभार मानले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसच्या काल झालेल्या वर्धापन दिन मेळाव्यानंतर शरद पवार आज अहिल्या नगर जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहेत. या दरम्यान त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. मी त्यांचा 'आभारी आहे' असे म्हणत शरद पवार यांनी मोदी यांचे आभार मानलेत.

अग्राग्रलेख

**खरीखरी..**

## रेल्वेचे २४ तास

भारतीय रेल्वेने गेल्या काही काळापासून कात टाकलेली आहे. नवनवीन गाड्या सुरू झालेल्या आहेत. त्यामध्ये वंदेभारत ही वेगवान गाडी आता चांगलीच लोकप्रिय होत आहे. या प्रकारच्या गाड्यांच्या डब्यात चांगल्या सुधारणा झालेल्या आहेत. प्रवाशांनी तक्रार केल्यावर लगेच प्रतिसाद मिळतो. अनेक ठिकाणचे अंतर कमी वेळात पार होते. थोडक्यात आपल्या देशातील रेल्वेचे जाळे अत्याधुनिक रितीने चालवण्याचा निर्णय स्वागतार्ह आहे. गेल्या काही वर्षात रेल्वेच्या पॅसेंजर गाड्या मोठ्या प्रमाणात कमी झालेल्या आहेत. सर्वसामान्य जनता या गाड्यांचा उपयोग करून प्रवास करण्यामध्ये आघाडीवर होती. या पॅसेंजर गाडीची तिकिटे अत्यंत म्हणजे अत्यंत कमी किमतीत मिळत असत. या गाड्या सर्व स्थानकावर थांबत असत. त्यात रिझर्वेशनची काहीच भानगड नसे. रेल्वेने या प्रकारच्या अनेक लोकप्रिय गाड्या बंद करून टाकल्यामुळे लहान गावातील रेल्वेची स्थानके अगदी ओकी-बोकी झालेली आहेत. संपूर्ण भारतातील कितीतरी पॅसेंजर गाड्या बंद झाल्यामुळे कमी अंतरावर जाण्यासाठी जी सुविधा उपलब्ध होती. ती आता जवळजवळ बंद झालेली आहे. पण ज्या प्रमाणात अत्याधुनिक गाड्या वेगवेगळ्या मार्गावर सुरु करण्यात आलेल्या आहेत. त्याची परिणीती या गाड्या बंद होण्यातच होईल, हे सांगायला कोणा ज्योतिषाची गरज नाही. एकूणच रेल्वेच्या वेगापासून ते खाना-पानापर्यंतची माहिती हल्ली सहज उपलब्ध होत असते. आतापर्यंत रिझर्व केलेल्या म्हणजेच आरक्षित केलेल्या तिकिटांची माहिती चार तासांपूर्वी जाहीर करण्यात येत होती. तोपर्यंत ज्यांची तिकिटे वेटिंग लिस्टवर असायची. जे वेटिंग लिस्टवर असायचे. त्यांच्या मनाची धाकधूक प्रचंड वाढत असे. केवळ चार तासाच्या वेळात दुसरी काही पर्यायी व्यवस्था करणे शक्यच नव्हते. त्यामुळे पूर्ण पैसे भरून प्रवाशांना चोरासारखा प्रवास करावा लागत होता. आता नुकताच रेल्वे कडून एक निर्णय झाल्याची बातमी आलेली आहे. त्यामध्ये रिझर्वेशन नसल्यास जबर दंड करण्यात येईल असे ठरलेले आहे. या सर्व खटाटोपामध्ये रेल्वेने आता आरक्षण यादी प्रवासापूर्वी २४ तास जाहीर करण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यामुळे प्रवाशांना पर्यायी व्यवस्था करणे सुलभ होणार आहे. दुसऱ्या गाडीची तत्काळ तिकिटे घेणे किंवा इतर काही व्यवस्था करणे. शक्य होऊन प्रवाशांना दिलासा मिळणार आहे. दिवसेंदिवस आपली भारतीय रेल्वे प्रवाशांभिमुख होत आहे. रेल्वेच्या २४ तासांच्या निर्णयाचे आपण स्वागत केले पाहिजे. त्यामुळे प्रवाशांची धावाधाव थांबेल आणि रेल्वेचे आरक्षण नसलेल्या प्रवाशांची गर्दीही कमी होईल. हा त्यामधील फायदा आहे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## मराठा समाजाच्या एसईबीसी आरक्षणाला
# स्थगिती नाहीच!

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ११ :**

राज्य सरकारने मराठा समाजाला एसईबीसी कायद्याअंतर्गत १० टक्के आरक्षण दिले होते. हे आरक्षण सरकारी नोकऱ्या आणि शैक्षणिक प्रवेशांमध्ये देण्यात आले.

मात्र, या निर्णयाविरोधात उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आल्या होत्या. त्याचबरोबर, आरक्षणाच्या समर्थनार्थही काही याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. आज मराठा आरक्षणासंदर्भात मुंबई उच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. या सुनावणीत दोन्ही बाजूंनी वकिलांनी आपले युक्तिवाद मांडले.

सुप्रीम कोर्टाने मे महिन्यात मुंबई उच्च न्यायालयाला मराठा आरक्षणासंबंधी दाखल सर्व याचिकांवर सुनावणी घेण्याचे निर्देश दिले होते. या याचिकांमुळे उच्च शिक्षणात मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांना आरक्षण मिळण्यात अडथळे निर्माण झाले आहेत. त्यामुळे मराठा आरक्षणाच्या वैधतेबाबत नव्याने सुनावणी आजपासून मुंबई उच्च न्यायालयात सुरू झाली आहे. आता हे आरक्षण कायद्याने मान्य ठरेल की नाही, याचा अंतिम निर्णय या सुनावणीतून होणार आहे.

मराठा आरक्षण प्रकरणावर मुंबई उच्च न्यायालयात विशेष त्रिसदस्यीय पूर्णपीठ, ज्यामध्ये न्यायमूर्ती रवींद्र घुगे यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठ आहे, सुनावणी घेत आहेत. सुनावणीच्या सुरुवातीला, हे प्रकरण तात्पुरत्या दिलास्यासाठी घ्यायचे की अंतिम निर्णयासाठी घ्यायचे, यावर वकिलांमध्ये आणि न्यायमूर्तींमध्ये युक्तिवाद झाला.

विरोधी वकिलांनी जोपर्यंत अंतिम निर्णय होत नाही, तोपर्यंत अंतरिम स्थगिती द्यावी, अशी मागणी केली. त्यानंतर, सरकारी वकिलांनी हे प्रकरण थेट अंतिम सुनावणीसाठीच घेतले जावे, असा युक्तिवाद मांडला.

मराठा आरक्षणाच्या सुनावणीबाबत बोलताना महाराष्ट्राचे महाधिवक्ता बिरेंद्र सराफ म्हणाले की, सर्वोच्च न्यायालयात मराठा आरक्षणाला आधीच अंतरिम दिलासा आहे. मग पून्हा सुनावणी घेण्यात अर्थ नाही, आता अंतिम सुनावणीला सुरूवात करायला हवी. यानंतर न्यायमूर्तींनी म्हटले की, मराठा आरक्षणाच्या विरोधात अनेक याचिका आहेत. त्यामुळे आपण सर्वांनी एकत्र बसून विरोधकांची बाजू नेमके कोण मांडणार हे ठरवा.

यावर विरोधी वकिल प्रदीप संचेती यांनी म्हटले की, प्रत्येक याचिकाकर्त्याने विविध विषय वाटून घेतले आहे. प्रत्येकाला आपले मत मांडायचे आहे. त्यामुळे प्रत्येकाला आपले मत मांडण्याचा अधिकार द्यायला हवा.

यानंतर न्यायाधिश घुगे यांनी, मराठी आरक्षणाची पुढील सुनावणी १८ तारखेला ३ वाजता आणि १९ जूलै २०२५ रोजी पुर्ण दिवस चालेल अशी माहिती दिली. त्यानंतर १९ जुलैला पुढची तारीख जाहीर केली जाणार आहे. आज मराठा समजाच्या एसईबीसी आरक्षणवर कुठलीही स्थगिती नाही, त्यामुळे मराठा विद्यार्थ्यार्ना एसईबीसी एडमिशनचा मार्ग मोकळा झाला आहे. आता पुढ़ील सुनावणी पुढ़िल महिन्यत १८-१९ जुलैला होणार आहे.

## नागपूरमध्ये मोबाइल मेडिकल युनिट्सद्वारे
## मोफत आरोग्य सेवा सुरू

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ११ :**

मुख्यमंत्री फडणवीस यांचा पुढाकार



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली नागपूर शहरातील दुर्लक्षित भागांतील नागरिकांसाठी एक दिलासादायक आरोग्य सेवा उपक्रम सुरू करण्यात आला आहे.

यासाठी सॅनोफी इंडिया लिमिटेड, नागपूर महानगरपालिका आणि पिरामल स्वास्थ्य व्यवस्थापन व संशोधन संस्था (पीएसएमआरआय) यांच्यात त्रिपक्षीय सामंजस्य करार होऊन दोन मोबाइल मेडिकल युनिट्स (एमएमयू) कार्यान्वित करण्यात आल्या आहेत.

हा उपक्रम सॅनोफीच्या सामाजिक उत्तरदायित्व (कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी -सीएसआर) कार्यक्रमांतर्गत राबविला जात आहे.

नागपूरमधील ३० वर्षांवरील सुमारे दोन लाख नागरिकांना या माध्यमातून मोफत प्राथमिक आरोग्यसेवा मिळणार आहे. विशेषतः मधुमेह, उच्च रक्तदाब व तोंडाचा कर्करोग यांसारख्या असंसर्गजन्य आजारांचे वेळीच निदान करून आवश्यक उपचार अथवा पुढील रुग्णालयीन सेवेसाठी रुग्णांना पाठविणे हे या युनिट्सचे मुख्य उद्दिष्ट आहे.

ही मोबाइल युनिट्स शहरातील आझाद कॉलनी, बडा ताज, बीडी पेठ, बिनाकी, छोटा जात, धंतेश्वरी नगर, धरम पेठ, डॉ. आंबेडकर नगर, एकात्मता नगर, गिट्टीखदान, गोपाल नगर, जैताळा, जयंती नगर, महात्मा फुले चौक, नंदनवन, पाचपोळी आदी विविध भागातील मार्गावर कार्यरत असून, नागरी गरीब व वंचित समाजघटकांपर्यंत सातत्याने आरोग्यसेवा पोहोचवली जात आहे. यासोबतच आरोग्य विषयक जनजागृती, जीवनशैली सुधारणा आणि व्यसनमुक्ती सल्ला सेवा यांचा समावेश देखील या उपक्रमात करण्यात आला आहे.

हा उपक्रम राज्य शासनाच्या सर्वसमावेशक व सुलभ आरोग्यसेवा प्रदान करण्याच्या दृष्टिकोनाशी सुसंगत असून, नागपूर महानगरपालिकेच्या सहकार्यामुळेच या सेवांची प्रभावी अंमलबजावणी शक्य झाली आहे. भविष्यात या उपक्रमाचा विस्तार करण्यासाठी राज्य शासनासोबत अधिक सघन सहकार्य करण्यात येणार आहे.

## सेवानिवृत्तांचा पुन्हा सत्तेवर कब्जा?

सरकारचा कंत्राटी निर्णय वादात : कर्मचारी संघटनांचा आक्षेप

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ११ :**

राज्य सरकारने सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना कंत्राटी पद्धतीने पुन्हा सेवेत घेण्याचा निर्णय घेतल्याने प्रशासनात वादाची नांदी झाली आहे.

६५ वर्षांपर्यंत सेवा देण्याचा मार्ग खुला करत, सरकारने मंत्रालयासह विविध विभागांतील निवृत्त अधिकारी पुन्हा कार्यरत करण्याचा मार्ग मोकळा केला आहे. मात्र, हा निर्णय कर्मचाऱ्यांच्या संघटनांना रुचलेला नाही. हा निर्णय नव्या पिढीवर अन्याय करणारा असून, मर्जीतल्या अधिकाऱ्यांची निवड करून पक्षपाती राजकारणाला खतपाणी घालणारा आहे, असा आक्रोश संघटनांनी व्यक्त केला आहे.

**तरुणांसाठी अडथळा?**

राज्यसेवेत नियमित भरती न करता कंत्राटी पद्धतीला प्राधान्य देणे ही सरकारची धोरणात्मक भूमिका असल्याचा आरोप कर्मचारी संघटनांनी यापूर्वीही केला होता. आता निवृत्त अधिकाऱ्यांनाच पुन्हा संधी देण्याच्या निर्णयामुळे, नव्या उमेदवारांच्या संधींवर गदा येत असल्याचं चित्र समोर येत आहे.

राज्य सरकार निवृत्तीचं वय ६० करण्यास तयार नाही, पण त्याच अधिकाऱ्यांना ६५ व्या वर्षापर्यंत पुन्हा सेवेत घेते, हे दुटप्पी धोरण नव्हे तर काय? असा सवाल संघटनांनी उपस्थित केला आहे.

या निर्णयाच्या अंमलबजावणीत निवडक अधिकाऱ्यांना संधी देण्याची शक्यता, तसेच सरकारच्या जवळच्या आणि मर्जीतल्या अधिकाऱ्यांनाच प्राधान्य मिळेल, अशी भीती संघटनांनी व्यक्त केली आहे. यामुळे कारभारात गटबाजी, भेदभाव आणि निष्पक्षतेचा अभाव दिसून येईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

## एसीचे तापमान २० अंशापेक्षा कमी नको

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ११ :**

येत्या काळात, जर तुम्ही नवीन एसी घेतला तर तुम्ही तो १६ किंवा १८ अंशांवर चालवू शकणार नाही, तुम्ही तो फक्त २० ते २८ अंशांदरम्यान सेट करू शकाल.

उन्हाळ्याच्या हंगामात एसीमधून होणारा वीज वापर थांबवण्यासाठी केंद्र सरकार लवकरच एक नवीन नियम आणत आहे.

सरकारचा दावा आहे की यामुळे वीज बचत होईल, बिल कमी होईल आणि देशभरातील लाखो ग्राहक पुढील तीन वर्षांत १८,०००-२०,००० कोटी रुपयांची बचत करतील. ऊर्जा मंत्री मनोहर लाल म्हणाले- एसी उत्पादक कंपन्यांसाठी नवीन नियमामुळे कूलिंग आणखी चांगले होईल.

## काँग्रेसचा गुरुवारी राज्यभर मशाल मोर्चा

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ११ :**

राज्य विधानसभा निवडणुकीतील वाढीव मतदानाचा मुद्दा काँग्रेसने पुन्हा हातात घेतला असून या मुद्द्यावर जनजगृती करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी गुरुवारी राज्यभर मशाल मोर्चा काढण्यात येणार आहे.

या मोर्चाच्या माध्यमातून विधानसभा निवडणुकीतील घोटाळ्याची चौकशी करण्याची मागणी करण्यात येणार आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ हे स्वतः गडचिरोलीमधील आंदोलनात सहभागी होणार आहेत. विधानसभा निवडणुकीतील ' मॅच फिक्सिंग' ची चौकशी करण्याची मागणी काँग्रेसने केली आहे.







# हरिसाल वनपरिक्षेत्रात वाघाची दहशत कायमच!

## शेवरीमुंडा भागात पुन्हा तीन गायींचा बळी ■ वनविभाग घटनास्थळी



**महासागर प्रतिनिधी**

**धारणी (दि.११).** गुगामल अभयारण्याच्या हद्दीतील हरिसाल वनपरिक्षेत्रात वाघाची दहशत अद्यापही कमी झालेली नाही. मागील आठवड्यात शेवरीमुंडा जंगल परिसरात वयोवृद्ध मुन्नू जावरकर यांना बळी घेतलेल्या वाघाने आता पुन्हा हल्ला चढवत तीन गायी फस्त केल्याची घटना समोर आली आहे. त्यामुळे या परिसरात नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

प्राप्त माहितीनुसार, हरिसाल येथील पशुपालक रमेश गोसाजी शनवारे यांच्या दोन गाई व नानुबाई रघुनाथ पंडोले यांची एक गाय जंगलात चारण्यासाठी नेत असताना वाघाने त्यांच्यावर हल्ला करून ठार केले. ही घटना गुरुवारी घडली असून शनिवारी संबंधित पशुपालकांनी ही माहिती हरिसाल वनपरिक्षेत्र अधिका?्यांना दिली.

> वाघाने शेवरीमुंडा भागात तीन गाईची शिकार केल्याचे निष्पन्न झाले असून, पंचनामा करून नुकसानभरपाई प्रक्रिया सुरू केली आहे.
>
> **राजेश धुमाळे,**
> **वनपाल, हरिसाल वनपरिक्षेत्र**

वनविभागाचे वनपाल राजेश धुमाळे आणि त्यांच्या पथकाने घटनास्थळी भेट देत पाहणी केली असता वाघाने गाईची शिकार केल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर तातडीने पंचनामा करण्यात आला असून नुकसान भरपाईसाठी प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

शेवरीमुंडा परिसरातील ही दुसरी मोठी घटना असून, यापूर्वीच्या मानवी हल्ल्याची भीती अद्याप नागरिकांच्या मनातून गेली नसतानाच पशुधनावरचा हा हल्ला पुन्हा घडल्याने ग्रामस्थांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे. वनविभागाकडून वाघाचा बंदोबस्त कधी होणार आणि नागरिकांच्या सुरक्षेसाठी पुढील काय पावले उचलली जातील, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

# तिवसा नगरपंचायतीच्या सर्वपक्षीय सदस्यांची जिल्हाधिकाऱ्यांना भेट



## ■ विकासकामे आणि अडचणींवर सविस्तर चर्चा
## ■ तिवसा शहराच्या विकासासाठी ठाम मागण्या

**महासागर प्रतिनिधी**

**तिवसा (दि.११) –** अमरावतीचे नवनियुक्त जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांची तिवसा नगरपंचायतीच्या सर्वपक्षीय सदस्यांनी सौजन्य भेट घेतली. या भेटीत जिल्हाधिकाऱ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले, तसेच भारतीय परंपरेनुसार त्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. या भेटीदरम्यान नगरपंचायतीच्या विविध विकासकामांबाबत तसेच प्रशासकीय अडचणींबाबत सविस्तर लेखी निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले. यामध्ये अभ्यासिका प्रकल्प, घनकचरा व्यवस्थापन, घरकुल योजना, पाणीपुरवठा, आदी कामांचा समावेश होता. या सर्व कामांची पाहणी करण्याची विनंती सदस्यांनी केली. नगराध्यक्ष प्रतिमा गौरखेडे, माजी नगराध्यक्ष व नगरसेवक वैभव वानखडे, तसेच विरोधी पक्षनेते अनिल थुल यांनी तिवसा शहरातील समाजोपयोगी योजनांची माहिती जिल्हाधिकाऱ्यांना दिली. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांकडे शहराच्या विविध समस्या तातडीने सोडवण्यासाठी प्रशासनात मुबलक व कायमस्वरूपी अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात यावी, अशी ठाम मागणीही करण्यात आली. या शिष्टमंडळात नगराध्यक्ष प्रतिमा गौरखेडे, विरोधी पक्षनेते अनिल थुल, माजी नगराध्यक्ष वैभव वानखडे, गटनेते किसनजी मुंदाने, नगरसेवक आशिष ढोले, नरेश लांडगे, नगरसेविका अर्चना भोंबे, मंगलाताई पडोळे, माजी नगरसेवक नरेंद्र विघ्ने, माजी शिवसेना शहरप्रमुख अजय आमले, हरिदास भगत, प्रणव गौरखेडे, आकाश मकेश्वर, तुषार लेवटे यांचा समावेश होता.

## आज द ग्रेट मराठा मल्टीपर्पजचा नगरपालिकेवर विविध मागण्यासाठी धडक मोर्चा



**महासागर प्रतिनिधी**

**वरूड (दि.११) –** शहरातील विविध समस्या घेऊन द ग्रेट मराठा मल्टीपर्पज आज दिनांक १२ ला नगरपालिकेवर धडक मोर्चा काढणार आहे या मोर्चात शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन द ग्रेट मराठा मल्टीपर्पजचे नितीन गुर्जर यांनी केले आहे.

शहरातील वेळेवर नाल्या सफाई न करणे, नियोजित वेळेवर पिण्याचे पाणी न देणे, त्याचबरोबर विद्युत लाईन विषयी अशा विविध मागण्यासाठी द ग्रेट मराठा मल्टीपर्पज ने नगरपालिकेवर मोर्चाचे आयोजन केले आहे. या मागण्या शहरातील प्रत्येक नागरिकांच्या जीवनाशी निगडित असल्यामुळे नेमका तोच मुद्दा हेरून द ग्रेट मराठा मल्टीपर्पजणे मोर्चाचे आयोजन केले आहेत, ते पुढे म्हणाले की आता पावसाळ्याचे दिवस सुरू झाले आहे धो धो पाऊस बरसणार आहे त्यामुळे नाल्या सफाई न केल्यास नाल्यामध्ये पाणी भरून ते रस्त्यावर वाहल्यानंतर वाहतुकीला अडथळा निर्माण होणार आहे एवढेच नाही तर काही नागरिकांच्या घरात पाणी घुसण्याची भीती आहे.

त्यामुळे अशा मूलभूत मागणीसाठी या मोर्चाचे आयोजन केले आहे त्याचप्रमाणे शहरातील विद्युत लाईन कधीही येणे आणि कधीही जाणे थोड्या थोड्या कामासाठी नागरिकांना वेठीस धरून लाईन बंद करणे यामुळे शहरातील नागरिक पुरते त्रासून गेले आहेत यालाही आळा बसावा म्हणून हा मोर्चा नगरपालिके नंतर विद्युत कार्यालयावर धडकणार आहे व संबंधित अधिकाऱ्यांना याविषयी निवेदन देऊन या व इतर मागण्या त्वरित पूर्ण करण्याकरिता संबंधित अधिकाऱ्यावर द ग्रेट मराठा लोकशाही मार्गाने दबाव आणून त्या मागण्या पूर्ण करणार असल्याचे सामाजिक कार्यकर्ते नितीन गुर्जर यांनी दैनिक महासागर शी बोलताना सांगितले .

# बच्चु कडू यांच्या आरोग्यासाठी तहसिल कार्यालयासमोर आध्यात्मिक हवन आज



**महासागर प्रतिनिधी**

**वरूड (दि.११) –** आमरण उपोषण सुरू असलेल्या माजी आमदार बच्चू कडू यांची प्रकृती खालावलेली असल्याने त्यांचे आरोग्य सुधारण्यासाठी उद्या दि. १२ जून रोजी तहसिल कार्यालयासमोर आध्यात्मिक हवन कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. प्रहार वरुड तालुका प्रमुख अजय चौधरी यांनी सर्व शेतकरी, शेतमजूर, अपंग, वाहनचालक आणि नागरिकांना उपस्थित राहून बच्चू कडू यांच्या उपोषणाला सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.


यावेळी प्रहार तालुका प्रमुख प्रणव कडू, सामाजिक कार्यकर्ते डॉ.प्रवीण चौधरी, कमलनारायण उइके, पवन वाढीवे, सुशील शेळके, मनोज उइके, बाळू पाटील, लीलाधर काकडे, विलास पांडागळे, सुमित चौधरी, पंकज कुंभारे, दिलीप गोरे, निलेश चौधरी, चंदू कडू, राहुल गावंडे, शामराव पाटील, सुलिद्र्र अध्रिले, अविनाश घाटोडे, रुपेश घोडकी, अनिल सराडकर, शेरु उपाशे, सुरेश नागले, रोशन रामटेके, राजा शहा, सलीम शेख, सैजद शाह, पप्पू बेलसरे, सतनामसिंग बाबरी, गौरव गोमकाडे, नाना निंभोरकर, आनंद पवार, राणासिंग बावरी आदी कार्यकर्ते व शेतकरी, शेतमजूर, अपंग बांधव सहभागी होऊन स्वतःच्या परीने सहकार्य करणार आहेत.




अमरावती – गेल्या पाच दिवसांपासून दैनिक महासागराने शहरातील कचऱ्यावर वृत्त मालिका चालवून महापालिका अधिकारी पुढारी आणि कंत्राटदारांची उडविली. त्यामुळे आता शहरातील विविध ठिकाणाहून कचरा उचलणे सुरू झाले आहे. आज बुधवारी परकोट येथील गांधी चौक ते जवाहर गेट मार्गावर कचरा उचलून उचलण्यात आला. त्याचबरोबर रुक्मिणी नगर येथील सायन्स कोर भिंतीच्या बाजूला अनेक महिन्यांपासून पडून असलेला मलमा उचलण्यात आला. तसेच इतर ठिकाणच्याही प्रमाणात कचरा व मलमा उचलण्यात आला. **(छायाचित्र मनीष जगताप)**

# मोझरी तालुक्यातील चुकीच्या फीडर रचनेमुळे नागरिक हैराण

## वारंवार वीज खंडित होत असल्याने संताप



**महासागर प्रतिनिधी,**

**तिवसा, (दि. ११) –** मोझरी येथील ३३ केव्ही वीज उपकेंद्रातील रोहित्रात झालेल्या तांत्रिक बिघाडामुळे मोझरी, तळेगाव ठाकूरसह परिसरातील अनेक गावांचा वीजपुरवठा खंडित झाला आहे. उन्हाच्या तीव्र झळांमध्ये वीज गेल्यामुळे नागरिक, शेतकरी, व्यापारी, विद्यार्थी व वयोवृद्ध हे अत्यंत त्रस्त झाले आहेत.

या समस्येचा मागील वर्षभरांपासून वरिष्ठ कार्यालयांकडे सातत्याने पाठपुरावा केला जात असतानाही अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. परिणामी मोझरी, गुरुकुंज मोझरी, गुरुदेव नगर, अनकवाडी, मालधुर, रघुनाथपूर, शेंदोळा, शिरसगाव (मो.), शिवणगाव ही सर्व गावे एकाच फीडरवर जोडलेली असल्याने, एका गावातील बिघाडाचा फटका संपूर्ण परिसराला बसतो आहे.

**केवळ पाच किलोमीटरवरचा अकार्यक्षम फीडर**

तिवसा ते मोझरी हे अवघं पाच किलोमीटर अंतर असूनदेखील त्याच फीडरवर संपूर्ण गावांना जोडल्यामुळे वीज व्यवस्थापनात अकार्यक्षमता दिसून येत आहे. वारंवार होणाऱ्या बिघाडांमुळे अनेकदा संपूर्ण परिसर वीजवंचित राहतो. त्यामुळे दुकाने, व्यवसाय ठप्प झाले असून नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे.

### अधिकाऱ्यांचा पाठपुरावा निष्फळ

मोझरीचे सहायक अभियंता सुनील रिठे यांनी सांगितले की, ङ्गया समस्येवर उपाययोजना व्हावी म्हणून अंदाजपत्रक तयार करून वरिष्ठ कार्यालयात सादर करण्यात आले आहे. माजी व आजी आमदारांना देखील माहिती देण्यात आली आहे. मात्र अद्याप कोणताही निर्णय झालेला नाही.ङ्ग

### नागरिकांचा रोष

नागरिकांनी वारंवार वीज खंडितीविरोधात तीव्र संताप व्यक्त केला आहे. तळेगाव ठाकूर येथील रहिवासी सुनील भारती म्हणाले, ङ्गआम्ही सतत वीजपुरवठा खंडित होण्यामुळे हैराण झालो आहोत. रात्रीच्या वेळेस लाईट बंद होणे हे धोकादायक ठरत आहे. आता पावसाळाही तोंडावर आहे, त्यामुळे साप आणि इतर जीवजंतूंचा धोका अधिक वाढला आहे.

### ठोस निर्णय घ्या, अन्यथा आंदोलन!

वीजपुरवठ्याचा हा अस्थिरपणा आणि तांत्रिक अकार्यक्षमता यामुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. शासन आणि महावितरणने या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने पर्यायी व स्थायी उपाययोजना करावी, अन्यथा जनआंदोलन छेडले जाईल, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

## सहा गावांचा प्रभार एकाच ग्रामसेवकाकडे; ग्रामस्थांत संतापाची लाट

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. ११) –** भातकुली पंचायत समितीच्या कार्यपद्धतीवर पुन्हा एकदा पक्षपातीपणाचे आरोप होत असून तब्बल सहा गावांचा प्रभार एकाच ग्रामसेवकाकडे दिल्याने ग्रामस्थांत तीव्र नाराजी आहे. आठवड्यातील पाच कामकाजाच्या दिवसांपैकी दोन दिवस भातकुली कार्यालयात तर उर्वरित तीन दिवस गावांमध्ये द्यावे लागतात. मात्र सहा गावांची जबाबदारी असल्याने एका गावाला महिन्यातून एकदाच अधिकारी भेट देतात, असा सवाल ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे. यामुळे शाळा दाखले, उत्पन्न-राहण्याचे दाखले, निवृत्तीवेतन आदी शासकीय कामे रखडली असून नागरिकांना तहसील किंवा तालुका कार्यालयांचे फेरे मारावे लागत आहेत. ग्रामसेवकाचे स्थानिक कंत्राटदार व वरिष्ठ अधिकाऱ्यांशी असलेले सलोख्याचे संबंध लक्षात घेता, प्रभार मुद्दामच त्याच्यावर सोपवण्यात आल्याची जोरदार चर्चा आहे. याआधी पाच गावांचा कारभार असतानाच त्यांच्याकडे आणखी एका गावाची जबाबदारी देण्यात आली. संबंधित बीडीओ व विस्तार अधिकारी त्याच पक्षाचे असल्याने अहवालही चांगले दिले जात असल्याचा आरोप होत आहे. नागरिकांनी तक्रारी करूनही प्रशासन कोणतीही कारवाई करत नसल्याने ग्रामसेवकावर अद्याप ठोस पावले उचलली गेलेली नाहीत.

### चौकशी करून कारवाईची मागणी

या प्रकाराची सखोल चौकशी करून जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी, अन्यथा आंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

## ॲग्रीस्टॅक नोंदणीशिवाय शासनाच्या सुविधांचा लाभ मिळणार नाही

**अमरावती** – जिल्हाधिकारी आशिष येरेकरांनी शेतक?यांना ?ग्रीस्टॅक योजनेअंतर्गत तत्परतेने नोंदणी करण्याचे आवाहन केले आहे. केंद्र व राज्य शासनाच्या अनेक महत्वाच्या कृषी योजना शेतकरी ओळख क्रमांकाशिवाय लाभार्थ्यांपर्यंत पोहोचणार नाहीत, असे त्यांनी स्पष्ट केले. शेतकरी ओळख क्रमांक मिळवण्यासाठी नागरिक सुविधा केंद्रात जाऊन आधारयुक्त मोबाईल नंबरद्वारे सातबारा तपशील सादर करावा, असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. ॲग्रीस्टॅक ही डिजिटल फाउंडेशन म्हणून शेतक?यांना शासनाच्या विविध योजनांचा जलद व परिणामकारक मार्गाने लाभ देण्यासाठी राबविली जात आहे. नोंदणी दरम्यान आधारशी संलग्न मोबाईलवर येणा?या जढ्ढ द्वारे शेतकरी ओळख क्रमांक मिळणार असून, तो यापुढे प्रत्येक साधनासाठी आवश्यक ठरणार आहे. जिल्ह्यातील सर्व तलाठी व कृषि सहायकरांना खातेदारांना प्राधान्याने नोंदणीचे मार्गदर्शन करण्याचे आदेश दिले गेले आहेत. जो शेतकरी ओळख क्रमांक अद्याप तयार करीत नाही, तो भविष्यातील कोणत्याही कृषी योजनांचा लाभ घेण्यापासून वंचीत राहणार आहे. त्यामुळे शासनाच्या सुविधा, सबसिडी, विमा, अनुदान व क्रेडिट योजनेसाठी ताबडतोब ॲग्रीस्टॅकमध्ये नोंदणी करण्यासाठी शेतकऱ्यांनी संबंधित तलाठी व कृषि सहाय्यक यांचेशी संपर्क साधावा, असे जिल्हाधिकाऱ्यांनी आवाहन केले.

# अंजनगाव, अचलपूर व परतवाडा परिसरात वादळी पावसाचे थैमान

**अनेक झाडे कोसळली, अनेकांच्या घरावरील छपरे उडाली ▌ अचानक आलेल्या पावसाने नागरिकांची तारांबळ**





*महासागर प्रतिनिधी*

***अंजनगांव सुर्जी, (दि.११)– जिल्ह्यातील अंजनगाव, अचलपूर व परतवाडा परिसरात या अवकाळी पावसामुळे शेती, घरे, वाहने आणि सार्वजनिक सुविधांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. गेल्या आठवड्याभरापासून तापमान वाढत असल्याने बैचेन झालेल्या नागरिकांना काहीसा दिलासा मिळाला, मात्र अचानक आलेल्या पावसाने तारांबळी उडविली. अचलपूरमध्ये अनेक झाडे कोसळल्याने वीज तारा तुटून शहरातील वीज पुरवठा अनेक तास खंडीत होता. नुकसानग्रस्तांनी शासनाकडून त्वरीत मदतीची मागणी केली आहे.***

## अंजनगाव तालुक्यात विजेचा कडकडाट व वादळी वाऱ्यासह पाऊस

**कृषी व मालमत्तेचे मोठे नुकसान, वीजपुरवठा खंडित**

**अंजनगाव सुर्जी**–अंजनगाव शहरासह परिसरात बुधवार, ११ जून रोजी दुपारी ३ वाजताच्या सुमारास अचानक हवामानात बदल झाला आणि विजेच्या कडकडाटासह जोरदार वादळी वा?यासह पाऊस कोसळला. अवकाळी पावसामुळे तालुक्यात अनेक भागांत मोठे नुकसान झाले असून, वीज वितरण यंत्रणाही पूर्णतः कोलमडली.



विशेषतः विहिगाव येथील शेतकरी सुयोग सुभाष काळे यांना मोठ्या नुकसानीचा सामना करावा लागला. उन्हाळ्यात पिकवलेला सुमारे १०० क्विंटल कांदा भाववाढीच्या आशेने त्यांनी घरामध्ये साठवून ठेवला होता. मात्र, वादळी वा?यांमुळे घराच्या छपरावरील टिन उडाले आणि पावसाचे पाणी घरात शिरले. परिणामी सर्व कांदा भिजून गेला असून, सुमारे दीड ते दोन लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

> ‘या अवकाळी पावसामुळे माझ्या घराचे नुकसान तर झालेच, पण लाखो रुपयांचा कांदा पाण्याखाली भिजून गेला आहे. त्यामुळे शासनाने नुकसान भरपाई द्यावी.‘
>
> **– सुयोग सुभाष काळे, विहिगाव**



## वीज पुरवठा खंडित

वादळामुळे विद्युत तारांवरही झाडे पडल्याने अनेक भागांत वीज पुरवठा खंडित झाला. विजेच्या तारा तुटल्याने अनेक तास वीज बेपत्ता होती गेल्या काही दिवसांपासून सतावणा?या उकाड्यातून नागरिकांना काहीसा दिलासा मिळाला, पण वादळी वा?यांनी पुन्हा चिंतेचे वातावरण तयार केले आहे.नगर परिषद आणि आपत्ती व्यवस्थापन विभागाने नुकसानग्रस्त भागांची पाहणी सुरू केली असून, झाडे हटवणे आणि वाहतूक पूर्ववत करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे.


### वाहतूक ठप्प – अमरावती मार्गावर अडथळा





## अचलपूर-परतवाडा शहरात वादळी पावसाचा धुमाकूळ

**अचलपूर/परतवाडा, (दि. ११)**– अचलपूर व परतवाडा या जुळ्या शहरांमध्ये १० व ११ जून रोजी दुपारी २.३० वाजता सुमारास हवामानाने अचानक पलटी घेतली. वादळी वाऱ्यासह झालेल्या जोरदार पावसामुळे शहरात अनेक ठिकाणी झाडे कोसळली, वाहनांचे नुकसान झाले आणि काही वेळ वाहतूक पूर्ण ठप्प झाली.



### झाडे कोसळली, वाहने फसली, वाहतूक ठप्प

अचलपूर व परतवाडा या जुळ्या शहरांमध्ये १० व ११ जून रोजी दुपारी २.३० वाजता सुमारास हवामानाने अचानक पलटी घेतली. वादळी वा?यासह झालेल्या जोरदार पावसामुळे शहरात अनेक ठिकाणी झाडे कोसळली, वाहनांचे नुकसान झाले आणि काही वेळ वाहतूक पूर्ण ठप्प झाली.

### अली हॉस्पिटल परिसरातील रोपटी उडाली

अचलपूरमधील अली हॉस्पिटलच्या आवारात लावलेली सर्व रोपटी वा?यामुळे उखडून पडली. पार्किंगमधील वाहनांवर झाडे कोसळल्यामुळे अनेक गाड्यांचे नुकसान झाले. कोसळलेल्या झाडांच्या आवाजाने परिसरात घबराट निर्माण झाली.

## वीज पडून बैल जोडी ठार; शेतकरी हवालदिल

**चुरणी**– अचानक आलेल्या वादळी पावसात दुपारी सुमारे तीनच्या सुमारास डोमा शिवारात बैल जोडी वीजेच्या झटकेने ठार झाल्याने शेतकरी मनोज जगन उईके (वय ४०, रहिवासी डोमा) हवालदिल झाला आहे. पेरणीच्या तोंडावर शेतात कामासाठी ठेवलेल्या या बैलांना झाडाशी बांधून कुटार खात असताना विजेचा प्रचंड कडकडाट झाला आणि थेट अंगावर वीज पडल्यामुळे दोन्ही बैल जागीच ठार झाले. मनोज उईके यांनी सांगितले, ङ्कशेतात पेरणीपूर्व तयारी करताना बैल जोडी झाडाला बांधली होती. दुपारी अचानक ढगांमध्ये वीज चमकली आणि पुढच्या क्षणात दोघांवर वीज कोसळली. घटनास्थळी पोहोचलेल्या स्थानिक तहसीलदारांनी पंचनामा करून लवकरच नुकसान भरपाईसाठी पशुसंवर्धन व कृषी विभागाशी समन्वय साधण्याचे आश्वासन दिले आहे.



**सेमाडोह व माखला येथे घरांची पडझड**

डोमा येथे वीज पडून बैलजोडी ठार झाली आहे. तसेच सेमाडोह व माखला येथे घरांची पडझड झाल्याची माहिती आहे. शासकीय नियमानुसार नुकसान झालेल्या कुटुंबांना शासनामार्फत सानुग्रह अनुदान देण्यात येणार असल्याची माहिती चिखलदराचे तहसीलदार जीवन मोरनकर यांनी बोलताना सांगितले.

## दर्यापूर तालुक्यातही वादळी पावसाची हजेरी

**रामागड येथे घरांचे व जनावरांचे मोठे नुकसान ▌ धामोडीमध्ये घराचे छप्पर उडाले**

**दर्यापूर**–इतर तालुक्याप्रमाणे दर्यापूर तालुक्यातील काही गावांना बुधवारी (दि.११) वादळी पावसाचा फटका बसला ज्यामध्ये ग्राम रामागड व धामोडी येथे नुकसानाची माहिती आहे.

तालुक्यातील रामागड गावात दि. ११ जून दुपारी अचानक आलेल्या अवकाळी पावसामुळे प्रसंगी इलेक्ट्रिक पोल कोलमडून खाली पडला आणि घरांची छप्परातील टिनपत्रे उडाली. अशोक लोणकर यांच्या कायमाना जनावरांच्या पायाला टिनपत्रे लागून गंभीर जखमा झाल्या. टिनच्या पर्त्यांनी परिसरात विखुरल्याने जनावरांचे नुकसान आणि घरांवरील वस्तूंचे नुकसान मोठ्या प्रमाणात झाल्याची माहिती मिळाली.



गावक?यांनी आवारात शेतकरी उपकरणे, घरातील आवश्यक सामुग्री आणि जनावरे सुरक्षित स्थळी हलवण्याचा प्रयत्न केला. मात्र विजेच्या पोल कोसळल्याने वीजपुरवठा तुटला असून, दूरसंचार सेवेवरही परिणाम झाला आहे. अचानक पावसाने गावात होाची परिस्थिती निर्माण केली आहे. उपसरपंच गणेशराव लाजुरकर यांनी प्रशासनाला त्वरित पंचनामे करून नुकसानभरपाईची प्रक्रिया सुरू करण्याची मागणी केली.





### धामोडी : वादळात उडाले घराचे छत

तालुक्यातील धामोडी येथील शेतकरी विष्णुपंत थर्डक यांच्या घरावर अचानक आलेल्या वादळी वा?यामुळे मोठे नुकसान झाले असून त्यांच्या घरावरील छपर पूर्णतः उडून गेले आहे. घरातील संसारोपयोगी साहीत्यही खराब झाले आहे. पेरणीचे दिवस अगदी तोंडावर असताना अशा कठीण प्रसंगी शेतकरी कुटुंब उघड्यावर आले आहे. या घटनेची दखल घेत राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचे माजी तालुका अध्यक्ष नितीन गावंडे यांनी प्रशासनाकडे तात्काळ पंचनामे करून आर्थिक मदत करण्याची मागणी केली आहे.

# मेळघाटातील दूध व्यवसायाला गती कधी मिळणार?

**पशुधन विपुल असतानाही शासनाचे दुर्लक्ष ▌ गवळी समाजाला प्रक्रिया उद्योगाची प्रतीक्षा**

**मारोती पाटणकर**

**चुरणी, (दि.११)**– मेळघाटातील चिखलदरा व धारणी या दुर्गम तालुक्यांमध्ये देशी गाई व म्हशींचे मोठ्या प्रमाणात पालन केले जाते. येथे गावरानी गाईच्या प्रजाती मुबलक असून, त्यांना चराईसाठी नैसर्गिक जंगल उपलब्ध आहे. अशा प्रकारे पशुपालनासाठी अनुकूल परिस्थिती असूनही, दूध व्यवसायाला आजतागायत अपेक्षित गती मिळालेली नाही, ही बाब अत्यंत दुर्दैवी आहे.

या परिसरात दूध, लोणी, तूप, खवा यासारख्या दुग्धजन्य पदार्थांची निर्मिती केली जाते. यामध्ये फॅटचे प्रमाणही इतर भागांपेक्षा अधिक असल्याने बाजारपेठेत या दुधाला चांगली मागणी आहे. मात्र, शासनाच्या उदासीन धोरणामुळे आणि लोकप्रतिनिधींच्या दुर्लक्षामुळे या व्यवसायाला आधुनिक स्वरूप प्राप्त होऊ शकलेले नाही. परिणामी, गवळी समाजाचे शेतकरी अजूनही पारंपरिक पद्धतीनेच दूध व्यवसाय करत आहेत. धारणी व चिखलदरा तालुक्यातील डोंगराळ भागात गवळी समाज मोठ्या प्रमाणात वास्तव्याला असून, त्यांचा मुख्य व्यवसाय पशुपालन व दूध उत्पादन आहे. गुराढोरांसाठी जंगलात चारा-पाण्याची व्यवस्था सुलभ आहे. पण दूध संकलन केंद्रे,



शीतसाखळी सुविधा, प्रक्रिया उद्योग यांचा अभाव असल्याने दुधाचे नुकसान होत आहे आणि शेतक?यांना अपेक्षित भावही मिळत नाही. गवळी समाजाने पशुधनावर आधारित व्यवसायातून स्वतःची संस्कृती, जीवनशैली आणि अर्थव्यवस्था उभारलेली आहे. मात्र आधुनिकतेचा स्पर्श न मिळाल्यामुळे आजही ते विविध समस्यांमध्ये अडकले आहेत. दूध साठवण, वाहतूक, विक्री, विपणन यामध्ये मोठ्या अडचणींचा सामना त्यांना करावा लागतो.

### तर स्थानिक अर्थव्यवस्थेचेही पुनरुज्जीवन होईल

शासनाच्या विविध योजनांची माहिती या भागातील नागरिकांपर्यंत पोहोचणेही आवश्यक आहे. राष्ट्रीय दुग्ध विकास योजना, सहकारी दूध संघटनांमार्फत कर्ज योजना, महिला बचत गटांना चालना यासारख्या योजनांचा लाभ दिल्यास येथील दूध व्यवसायाला नवसंजीवनी मिळू शकते. दूध प्रक्रिया उद्योग उभा राहिल्यास फक्त शेतक?यांचेच नव्हे तर स्थानिक अर्थव्यवस्थेचेही पुनरुज्जीवन होईल. त्यामुळे शासनाने तातडीने लक्ष घालून धोरणात्मक निर्णय घ्यावेत, अशी मागणी आज मेळघाटातील शेतकरी व दूध उत्पादकांकडून होत आहे.

> मेळघाटात दूध उत्पादनासाठी सर्व अनुकूलता असताना आजही येथे मोठ्या प्रमाणात दूध प्रक्रिया उद्योग उभारले गेले नाहीत. शासनाने पुढाकार घेऊन प्रक्रिया उद्योगासाठी स्वतंत्र प्रकल्प मंजूर करावेत, जेणेकरून या भागातील तरुणांना रोजगार आणि गवळी समाजाला आर्थिक स्थैर्य मिळू शकेल.
>
> **जयंत खडके, माजी संचालक, अमरावती जिल्हा दूध उत्पादक संघ.**



## मतदारांच्या हक्कासाठी कॉंग्रेसचा मशाल मोर्चा

**अमरावती**– निवडणूक आयोग पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या इशाऱ्यावर काम करत असून, विधानसभा निवडणुकीत झालेल्या गोंधळाची पुनरावृत्ती आगामी निवडणुकीत होऊ नये, यासाठी आयोगाने जागे होण्याची गरज आहे, असा घणाघात कॉंग्रेसचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांनी केला. याच पार्श्वभूमीवर १४ जून रोजी कॉंग्रेसकडून अमरावतीत भव्य मशाल मोर्चा काढण्यात येणार आहे. पत्रपरिषदेत बोलताना त्यांनी सांगितले की, मतमोजणी प्रक्रियेत झालेली शंका आणि आयोगाची भूमिका संशयास्पद आहे. आमचे नेते निवडणूक आयोगाला प्रश्न विचारतात, तर उत्तर मोदी सरकारकडून दिले जाते. त्यामुळे आयोगाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. याच पार्श्वभूमीवर १४ जून रोजी कॉंग्रेसकडून अमरावतीत भव्य मशाल मोर्चा काढण्यात येणार आहे. मतदारांच्या हक्कासाठी, लोकशाही व संविधानाच्या रक्षणासाठी हा मोर्चा असल्याचे देशमुख यांनी सांगितले. जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राष्ट्रपती व राज्यपाल यांना निवेदन पाठवण्यात येणार आहे.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# मेक इन इंडियाचा डिफेन्समध्ये धमाका

गेल्या ११ वर्षांत देशाच्या संरक्षण क्षेत्रात मोठा बदल दिसून आला. भारताची संरक्षण नीती केवळ सुरक्षे इतपत मयार्दीत नाहीत. संरक्षण क्षेत्रात आत्मनिर्भरता, नवकल्पना, जागतिक स्पर्धेत भारताने सशक्त पाऊल टाकले आहे. भारतीय संरक्षण क्षेत्राकडे जग नव्या दृष्टिकोनातून पाहात आहे. केंद्र सरकारची रणनीती, मजबूत इच्छाशक्ती आणि भविष्यासाठीची धोरण यासाठी कारणीभूत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संरक्षण क्षेत्रातील उत्पादनात आधुनिकीकरण आणि आत्मनिर्भरतेला अधिक महत्त्व दिले आहे.

-------------------



भारताच्या संरक्षण अर्थसंकल्पात मोठी वाढ झाली आहे. २०१३-१४ मध्ये हे बजेट २.५३ लाख कोटी होते. ते २०२५-२६ या वर्षात वाढून ६.८१ लाख कोटी रुपये इतके झाले. हा केवळ एक आकडा नाही. तर भारताची सुरक्षा, तांत्रिक प्रगती आणि आत्मनिर्भरतेच्या दृष्टीने मोठे पाऊल आहे.

भारताने संरक्षण उत्पादनात मोठी झेप घेतली आहे. २०२३-२४ मध्ये देशाने १.२७ लाख कोटी रुपयांचे संरक्षण उत्पादन केले होते. तर २०१४-१५ मध्ये ४६,४२९ कोटी रुपये खर्च करण्यात आले होते. म्हणजे या काळात १७४% हून अधिकचा खर्च वाढला आहे.

**स्थानिक उद्योगांचा मोठा वाटा**

संरक्षण क्षेत्रात आता खासगी कंपन्या आणि स्टार्टअप्स पण मोठी भूमिका निभावत आहेत. संरक्षण उत्पादनात स्वदेशीचा नारा उपयोगी ठरला आहे. त्यामुळे विविध उपकरणांचे उत्पादन वाढणार आहे. संरक्षण मंत्रालयाने २०२४-२५ मध्ये २.०९ लाख कोटींचे १९४ संरक्षण करार केले होते. त्यातील १७७ करार हे स्थानिक उद्योग आणि स्टार्टअप्सला मिळाले आहेत. हा एक विक्रमच म्हणावा लागेल.

**औद्योगिक कॉरिडॉरमध्ये वाढली गुंतवणूक**

उत्तर प्रदेश आणि तामिळनाडूमध्ये संरक्षण औद्योगिक कॉरिडोरमध्ये बदल होत आहे. आतापर्यंत इंडस्ट्रीयल कॉरिडोरमध्ये ८,६५८ कोटींहून अधिकची गुंतवणूक झाली आहे. २५३ पेक्षा अधिक टङ्कव वर स्वाक्षरी झाली आहे. येत्या काळात ही गुंतवणूक ५३,४३९ कोटींपर्यंत जाण्याची शक्यता आहे.

सरकारने आतापर्यंत ५ सकारात्मक स्वदेशी विषय सूची तयार केल्या आहेत. यामध्ये ५५०० अधिक वस्तूंचा समावेश आहे. यामध्ये ३००० हून अधिक संरक्षण उत्पादनं ही आता स्वदेशी आहेत. यामध्ये दारुगोळा, गन, असॉल्ट रायफल, हलके लढाऊ विमानं, रडार आणि चिलखती वाहनांसारख्या तांत्रिकदृष्या अत्याधुनिक प्रणालींचा समावेश आहे.

**संरक्षण निर्यातीत विक्रमी झेप**

देशातील संरक्षण क्षेत्र केवळ उत्पादनापुरतं मर्यादित राहिलेलं नाही, तर संशोधन, नवकल्पना आणि जागतिक निर्यातीच्या दिशेनं सुसंगत वाटचाल सुरू आहे. यामध्ये iDEX सारख्या नवाचारी उपक्रमांनी आणि सरकारच्या दृढ धोरणांनी क्रांती घडवली आहे.

त्यासाठी आतापर्यंत ४३० हून अधिक iDE करार करण्यात आले आहेत. भारताने संरक्षण क्षेत्रात नव प्रणाली, तंत्रज्ञानाच्या वापरासाठी २०१८ मध्ये iDE(इनोवेशन फॉर डिफेन्स एक्सिलेंस) ची सुरुवात केली होती. संरक्षण दलाने या प्रणालीशी संबंधित २,४०० कोटींहून अधिक खरेदी केली आहे. त्यासाठी २०२५-२६ या वर्षात ४४९.६२ कोटींचे बजेट निश्चित करण्यात आले आहेत.

**निर्यातीत नवीन विक्रम**

भारताच्या संरक्षण क्षेत्राने मोठी कात टाकली आहे. २०१३-१४ मध्ये ६८६ कोटींची निर्यात झाली होती. त्या तुलनेत २०२४-२५ मध्ये २३,६२२ कोटींची निर्यात वाढ दिसून आली. म्हणजे दहा वर्षांहून अधिकच्या काळात संरक्षण क्षेत्रातील निर्यात ३४ पट वाढली आहे. २०२९ वर्षापर्यंत ही निर्यात ५०,००० कोटींवर पोहचेल.

एकूणच काय तर संरक्षण क्षेत्रात गेल्या ११ वर्षात भारताने उत्तुंग भरारी घेतल्याचे दिसून येते.

■ ■ ■

# कामगार लढ्याचा इतिहास

नारायण मेघाजी लोखंडे यांनी आठवड्यातील सातही दिवस राबणाऱ्या कामगारांकरिता साप्ताहिक सुटीसाठी लढा दिला, मागणी रेटून धरली, दि.९ जून १८९० रोजी ती मंजूर करून घेतली आणि दि.१० जून १८९० पासून रविवार ही साप्ताहिक सुट्टी म्हणून जाहीर झाली. जी आजपर्यंत चालू आहे. गिरणी कामगारांना रविवारी साप्ताहिक सुट्टी मिळावी. दुपारी, कामगारांना अर्धा तास सुट्टी मिळावी. या मागण्या मान्य करून घेतल्या.

---------------

रविवार हा आठवड्यातील एक वार आहे. सोमवारपासून मोजला तर हा आठवड्यातील शेवटचा, म्हणजे सातवा दिवस येतो. भारतात हा वार रवीचा म्हणजेच सूर्याचा दिवस समजला जातो. त्यामुळे याला आदित्यावार (आदित्य=सूर्य) किंवा बोली भाषेत आइतवार म्हंटले जाते आणि इंग्रजीत संडे. ज्या ज्या देशावर कधी काळी ब्रिटिश सत्ता होती, त्या त्या देशात रविवार हा सुट्टीचा दिवस असतो. शिक्षणसंस्था, कार्यालये आणि बँका या दिवशी बंद असतात.



एके काळी भारतात कामगारांना रविवारची सुट्टी नसे. नारायण मेघाजी लोखंडे यांनी मुंबईत १८८४ मध्ये बॉबे मिल हॅंड्स ही भारतातली पहिली कामगार संघटना स्थापन केली. त्यांनी त्या काळच्या फॅक्टरी कमिशनकडे अनेक मागण्या केल्या. त्यातली रोजच्या कामातली अर्ध्या तासाची जेवणाची सुटी आणि रविवारची साप्ताहिक सुट्टी या दोन महत्त्वाच्या मागण्या होत्या. त्यासाठी २४ एप्रिल १८९० रोजी हजारो कामगारांचा मोर्चा निघाला होता.

अखेर ९ जून १८९० रोजी प्रस्तावाला मंजूरी देवून १० जून १८९० पासून दर रविवारची सुट्टी देण्याचे गिरणी मालकांनी सुरू केले. २०१५ साली १० जूनला या रविवारच्या सुट्टीचा १२५ वा वर्धापन दिन साजरा झाला. पुण्यात रविवार हा मिसळवार म्हणून ओळखला जातो.

पाश्चात्त्य कल्पनेप्रमाणे आठवड्याचा पहिला वार परंतु व्यावहारिकदृष्ट्या शेवटचा वार. या वाराचे नाव बहुतेक सर्व देशांत सूर्यवाचकच आहे. भारतीय ज्योतिषशास्त्रीय कल्पनेनुसार या दिवशीच्या सूर्योदयापासून पहिल्या होऱ्याचा अधिपती सूर्य असतो. जगात सर्व ठिकाणी सूर्याला देवताच मानतात.

जैन धर्मात नऊ वर्षे केले जाणारे एक व्रत आषाढमासाच्या शेवटच्या रविवारपासून पुढे ९ रविवार चालते. मुसलमान बांधव दर चांद्रमासातील पहिल्या रविवारी मंत्र-तंत्र करतात. काही खिस्ती पंथ रविवार हा प्रभूच्या प्रार्थनेचा व विश्रांतीचा दिवस म्हणून पाळतात. येशू खिस्ताच्या पुनरुत्थानाचा साप्ताहिक स्मृतिदिन म्हणून सर्वच खिस्ती लोक रविवार हा प्रार्थनेचा दिवस पाळतात.

कॉन्स्टंटाइन या सम्राटांनी आज्ञापत्र काढून रविवार हा सुटीचा दिवस ठरविला. ईस्टरच्या अलीकडचा रविवार पामसंडे म्हणून प्रसिद्ध आहे. खिस्तांचा जेरूसलेममध्ये विजयी प्रवेश झाला, तेव्हा त्यांच्या मार्गावर पामवृक्षाच्या फांद्या पसरल्या होत्या. म्हणून याला पामसंडे म्हणतात. रविवार विशेष शुभ मानला जात नसल्याने कोणताही उपक्रम या दिवशी सुरू करीत नाहीत. मात्र या दिवशी दृष्टिदोष दूर करणारी यंत्रे वापरून उपचार करण्यास हरकत नसते, असे मानतात.

रावबहादुर नारायण मेघाजी लोखंडे (१८४८-१८९७) हे भारतातील कामगार संघटना चळवळीचे जनक होते. १९ व्या शतकात कापड गिरणीच्या कामगारांची परिस्थिती सुधारण्यासाठीच नव्हे तर जातीय आणि सांप्रदायिक मुद्द्यांवर त्यांनी केलेल्या धाडसी पुढाकारासाठीही त्यांची आठवण ठेवली जाते.

याशिवाय सन १८९५ मध्ये हिंदू-मुस्लिमांदरम्यान झालेल्या दंगलीत केलेल्या कामाबद्दल त्यांना रावबहादूर ही पदवीही देण्यात आली होती.

तत्कालीन ब्रिटिश भारत सरकारने त्यांना जस्टिस ऑफ पीस हा सन्मान देऊन सन्मानित केले होते. भारत सरकारने २००५ मध्ये त्यांच्या छायाचित्रासह एक टपाल तिकीट जारी केले.

नारायण मेघाजी लोखंडे हे महात्मा जोतिराव फुले यांचे प्रमुख सहकारी होते. त्यांचा जन्म पुणे जिल्ह्यातील कण्हेरसर येथील माळी कुटुंबात झाला. त्यांचे शिक्षण हायस्कूलपर्यंत झाले होते. त्यांच्या पत्नीचे नाव गोपिकाबाई होते. गोपीनाथ नावाचा त्यांना एक मुलगा होता.

१८७४ मध्ये माहिती मिळाल्यानंतर ते सत्यशोधक चळवळीचे सदस्य झाले. सन १८८० पासून त्यांनी मुंबईहून प्रकाशित होणाऱ्या दीनबंधूचे व्यवस्थापन हाती घेतले. सुरुवातीस रेल्वे खात्यात कारकून म्हणून व पुढे पोस्ट खात्यात काही काळ नोकरी केल्यावर त्यांना मुंबईच्या मांडवी भागात एका कापड गिरणीत भांडारपालाची नोकरी मिळाली.

तेथे त्यांना दहशतीच्या वातावरणात दिवसातून १३-१४ तास काम करीत असलेले गिरणी कामगार आढळले; त्यांना आठवड्याची सुट्टीही मिळत नसे; परिणामी लोखंडे यांनी नोकरी सोडून स्वतःस कामगार चळवळीस वाहून घेण्याचे ठरविले.

त्याकरिता ते कामगार वस्तीतच राहू लागले. त्यांनी भारतातील पहिली कामगार संघटना बॉम्बे मिलहॅंड्स असोसिएशन २३ सप्टेंबर १८८४ रोजी स्थापन केली आणि समाजसेवेत स्वतःला पूर्णपणे वाहून घेतले.

नारायण मेघाजी लोखंडे यांना भारतातील ट्रेड युनियन चळवळीचे जनक म्हणून ओळखले जाते. त्यांच्यासह महात्मा फुले यांनी मुंबईतील कापड कामगारांच्या सभांनाही संबोधित केले.

त्यांनी आठवड्यातील सातही दिवस राबणाऱ्या कामगारांकरिता साप्ताहिक सुटीसाठी लढा दिला आणि ९ व १० जून १८९० पासून रविवार ही साप्ताहिक सुट्टी म्हणून जाहीर झाली जी आजपर्यंत चालू आहे. एन.एम.लोखंडे यांच्यामुळे गिरणी कामगारांना मिळालेले काही हक्क हे होते.

गिरणी कामगारांना रविवारी साप्ताहिक सुट्टी मिळावी.

दुपारी, कामगारांना अर्धा तास सुट्टी मिळावी.

मिलच्या कामाला सकाळी साडेसहा वाजल्यापासून सुरुवात करावी आणि सूर्यास्तानंतर बंद करावी.

कामगारांचे पगार दर महिन्याच्या १५ तारखेपर्यंत करावेत.

ब्रिटिश राजवटीने त्यांना रावबहादूर ही पदवी बहाल केली होती. त्यांनी मुंबई कामगार संघ स्थापन केला. कष्टकरी वर्गाने एकजुटीने अन्यायाचा कडाडून प्रतिकार केला पाहिजे, अशी सशक्त प्रेरणाच ते आज ठरले आहेत.

फुले व त्यांचे सहकारी कृष्णराव भालेकर आणि लोखंडे यांनी शेतकरी आणि कामगारांना संघटित करण्याचा प्रयत्न करण्यापूर्वी त्यांच्या तक्रारींचे निवारण करण्याचा प्रयत्न कोणत्याही संघटनेने केला नाही, हे विशेष!



**कृष्णकुमार आनंदी गोविंदा निकोडे**
**गडचिरोली.**
**९४२३७१४८८३**

■ ■ ■

# मुलगी श्रीमंत घरी खरंच सुखी राहील का?

आजकाल प्रत्येक आई वडिलांना वाटते की, आपली मुलगी श्रीमंत घरातील श्रीमंत मुलाला द्यावी. म्हणजे श्रीमंत घरी आपली मुलगी चैन विलासात राहील. तिला कोणत्याच गोष्टीची कमतरता भासणार नाही. तिला सर्व भौतिक सुख-सुविधा जाग्यावर उपलब्ध होतील.

ती ऐश्वर्यसंपन्न व राणीसारखे जीवन जगेल. सर्व भौतिक सुख-सुविधा तिच्या पायावर लोळण घेतील. समाजात व गावात आपली प्रतिष्ठा वाढेल. भावकीत व गावकीत मोठ्या अभिमानाने सांगता येईल की, माझी मुलगी खूप मोठ्या घरी दिली आहे. तिच्या घरी अमाप पैसा व संपत्ती आहे. अलिशान गाडी व अलिशान बंगला आहे.तिच्या घरात नोकर चाकर आहेत. तिच्या घरी कोणतीच व कशाचीच कमी नाही. असे नातेवाईकांना व भावकीला ठणकावून सांगण्यासाठी आणि आपली सामाजिक प्रतिष्ठा वाढावी म्हणून प्रत्येक आई वडील आपल्या मुलींना श्रीमंत घरी देण्याचे स्वप्न पाहत आहेत.

पण त्यासाठी तो मुलगा दारुडा व व्यसनी आहे का? आपल्या मुलीला खरंच सुखी ठेवेल का? का दारू पिऊन आपल्या मुलीला रोजच त्रास देईल? या गोष्टीचा विचार करणे हे प्रत्येक आई-वडिलांचे परम कर्तव्य आहे. केवळ मुलगा श्रीमंत आहे म्हणून कोणताही मागचा पुढचा विचार न करता मुलीला त्या घरी देणे म्हणजे स्वतःच्या पायावर धोंडा मारून घेण्यासारखे आहे.

पण आजकाल तेवढा विचार कोण करतोय? केवळ सामाजिक प्रतिष्ठेसाठी आपल्या मुलीला मनपसंत श्रीमंत स्थळ बघतोय. आणि आपल्या मुलीचे लग्न एकदाचे उरकून टाकतोय. म्हणूनच आजकाल समाजात व गावात आपल्या मुलीला श्रीमंत घरी देण्याची प्रत्येक आई-वडिलांची जणू स्पर्धाच सुरू झाली आहे. त्यासाठी मुलींचे बिचारे आई-वडील दिवसभर शेतात जीवाचे रान करतात. वीट भट्टीची किंवा उसाची उचल घेऊन पैसा गोळा करतात, नसेल तर सावकाराचे कर्ज काढतात आणि ऐपत नसताना देखील केवळ सामाजिक प्रतिष्ठेसाठी मुलाला मनमानी हुंडा देऊन आपल्या मुलीला मोठ्या घरी देतात.

सोनं नाणं देऊन मुलांच्या सर्व इच्छा पूर्ण करतात. लग्न राजेशाही थाटात लावून देतात. लग्नाला गाव जेवण देतात. सर्व पाहुणे रावळे बोलावतात. आणि आपली व आपल्या मुलीची एकदाची हौस पूर्ण करतात. मुलगी नवऱ्या घरी नांदायला जाते. एक-दोन महिने नवरा व सासू-सासरे तिला चांगली वागणूक देतात. पोटच्या मुलीप्रमाणे सांभाळतात. तिला खूप खूप जीव लावतात.

तिकडे मुलीचे आई-वडील मात्र आता आपली मुलगी सुखाने व आनंदाने नांदत आहे म्हणून समाधानी असतात. त्या दोघांचा संसार सुखाने चालत असतो. पण त्यांच्या सुखी संसाराला कोणाची कुठून व कशी नजर लागते हे कळायला मार्ग नसतो. त्या मुलीचा नवरा दारुडा व व्यसनी निघतो. तिथूनच मुलीचा मानसिक व शारीरिक छळ सुरू होतो.

तिच्या बावनकशी चारित्र्यावर संशय घेतला जातो. तिला नाहक नावे ठेवून बदनाम केले जाते. नवरा रोज दारू पिऊन येतो आणि तिला मारहाण करतो. तिला घाण घाण शिव्या देऊन तिच्या भावना दुखावतो. तुझ्या आई-वडिलांनी मला लग्नात काय दिले? तुझ्या आई वडिलांनी मला लग्नात खूप कमी हुंडा दिलाय. आता आणखीन हुंडारुपी म्हणून काहीतरी पैसे किंवा गाडी घेऊन द्यायला सांग. नाहीतर तू आमच्या घरातून निघून जा आणि तुझ्या आई-वडिलांकडेच जाऊन रहा. इकडे आमच्याकडे येऊ नकोस. अशा मागणीचा तगादा मुलीकडे लावतात, छळ करून तिला घरातून बाहेर काढतात आणि माहेरचा रस्ता दाखवतात.

ती बिचारी मुलगी मात्र आपल्या आई-वडिलांकडे जाते. आणि त्यांना सर्व हकीकत सांगते. तेव्हा आई-वडिलांना हे ऐकून खूप खूप दुःख वाटते. मुलीच्या आई वडिलांच्या मनात तर वेगळ्याच अपेक्षा राहतात. पण इथे तर वेगळेच काहीतरी होऊन जाते. त्यांच्या पायाखालची जमीन सरकते. त्यांना आभाळ फाटल्यासारखे होते. एवढे अतोनात दुःख त्यांना होते. आणि मग ते पश्चातापात पडतात. स्वतःला दोष देत बसतात.

आता आपल्याला समाज काय म्हणेल? भावकी व नातेवाईक काय म्हणतील? या विचारांनी ते हतबल होतात. हे प्रकार सध्या सर्वत्र सुरू आहेत. नुकतेच घडलेले वैष्णवी हगवणे प्रकरण सध्या महाराष्ट्रात गाजत आहे. हे आपल्याला माहित आहे. वैष्णवी हगवणे हिला तिच्या आई-वडिलांनी मायंदळ हुंडा देऊन तिला श्रीमंत घरी दिले होते. पण श्रीमंत घरी तिच्यावर तिच्या नवऱ्याने व सासू-सासऱ्याने कसा अमानुषपणे मानसिक व शारीरिक छळ केला. हे आपण जाणून आहोत.

आई-वडिलांना चांदीचे भांडे घेऊन द्यायला सांग म्हणून तिच्यावर वांरवार अमानुषपणे अत्याचार केला जात होता. नाहक तिच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिला बदनाम केले जात होते. या रोजच्या शारीरिक व मानसिक छळाला कंटाळून तिने आपली जीवनयात्रा संपवली. ही महाराष्ट्राला हादरवून टाकणारी घटना आहे. याचा प्रत्येक आई-वडिलांनी जरूर विचार करावा.

मुलगी श्रीमंत घरी दिल्यावरच सुखी राहते हा आई-वडिलांचा गैरसमज आहे. हा गैरसमज प्रत्येक आई-वडिलांनी मनातून काढून टाकावा. आपली मुलगी श्रीमंत घरी द्या किंवा गरीब घरी द्या याला माझा विरोध नाही. पण मुलगी केवळ श्रीमंत घरीच सुखी राहील हे मीच काय? कोणीही सांगू शकत नाही. जो मुलगा निर्व्यसनी व होतकरू आहे आणि आपल्या मुलीला आयुष्यभर चांगल्या प्रकारे जीव लावून सांभाळू शकतो अशाच निर्व्यसनी, होतकरू व चारित्र्यसंपन्न मुलाला आपली मुलगी जरूर द्या. तो आपल्या मुलीला राणी सारखा ठेवेल...त्यांच्या सुखी संसाराला कोणाचीच नजर लागणार नाही. आणि श्रीमंत घरी द्याल तर आपल्या मुलीचे वैष्णवी हगवणे प्रकरण झाल्याशिवाय राहणार नाही... एवढे ध्यानात ठेवा...


--------------

**बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी, ता.अहमदपूर, जि. लातूर**
**७४९८७१५६६१**

■ ■ ■

# लाडक्या बहिणींसाठी दारूधोरण





**दिपक कैतके**
**मुंबई.**

माझी लाडकी बहीण योजनेचा हप्ता वेळेवर देण्यासाठी आता राज्य सरकारने दारूबंदीलाच नवा अर्थ दिला आहे. राज्याच्या इतिहासात प्रथमच सर्व प्रकारच्या मद्यावर तब्बल ५०% पेक्षा अधिक करवाढ करून महसूलवाढीचा दारूचा उपाय मंत्रिमंडळाने मंजूर केला आहे. या निर्णयामुळे राज्याच्या तिजोरीत दरवर्षी सुमारे १४ हजार कोटी रुपये भर पडणार असून, परकीय मद्यावर तर ७० टक्क्यांपर्यंत दरवाढ करण्यात आली आहे.

**लाडक्या बहिणींसाठी खडखडाट मग दारूपट्टीचे टॉनिक!**

राज्य सरकारने महिलांसाठी जाहीर केलेल्या माझी लाडकी बहीण योजनेसाठी दरमहिना १५०० रुपये आणि भविष्यात २१०० रुपये देण्याची घोषणा केली होती. मात्र, या योजनेसाठी लागणाऱ्या ३५ ते ४० हजार कोटींच्या वार्षिक खर्चामुळे सरकारला आर्थिक तंगीतून मार्ग काढावा लागतो आहे. परिणामी, राज्य उत्पादन शुल्क विभागाने दारूच्या दरांमध्ये भरमसाठ वाढ करण्याचा निर्णय घेतला आणि मंत्रिमंडळाने त्यावर शिक्कामोर्तब केलं.

**देशी-विदेशी मद्यावर एकदम हैवाना दरवाढ**

| मद्य प्रकार | जुना दर (१८० मि.ली.) | नवा दर | वाढ (%) |
|---|---|---|---|
| देशी दारू | रू.७० | रू.८० | १४% |
| महाराष्ट्रात निर्मित दारू | रू.१४८ | – | |
| भारतीय बनावटीचे विदेशी मद्य | रू.१२० | रू.२०५ | ७०% |
| प्रिमियम विदेशी मद्य | रू.२१० | रू.३६० | ७०% |

सर्वसामान्य ग्राहकांपासून प्रिमियम ब्रँडचे चाहते सर्वांनाच याचा फटका बसणार असून, मुंबईतील हॉटेल्स व रेस्टॉरंट्समध्ये विदेशी मद्य विक्रीसाठी १५% अतिरिक्त शुल्क आकारले जाणार आहे. बीयर मात्र यापासून वगळण्यात आली आहे, कारण देशात सर्वाधिक बीयर दर आधीच महाराष्ट्रातच आहेत.

**दारूपासून आता राज्याच्या तिजोरीत भरभरून राजस्व**

सध्या उत्पादन शुल्क व दारू विक्रीतून राज्याला ४५ हजार कोटींचा वार्षिक महसूल मिळतो. आता नव्या दरवाढीनंतर हा महसूल ६० हजार कोटींवर जाण्याची शक्यता आहे. यामुळे राज्याच्या महसुली उत्पन्नाच्या १० टक्क्यांहून अधिक वाटा केवळ दारू विक्रीतून मिळणार आहे.

**विभागीय बळकटी व एआय नियंत्रण**

राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या यंत्रणेसाठी ७४४ नवीन पदे व ४७९ पर्यवेक्षक पदे मंजूर करण्यात आली आहेत. तसेच एआय प्रणालीद्वारे संपूर्ण मद्य उत्पादन-साखळीवर लक्ष ठेवण्यासाठी एकात्मिक नियंत्रण कक्ष स्थापन केला जाणार आहे.

महायुती सरकारच्या महिलांसाठीच्या लोकप्रिय योजनेला आर्थिक बळ देण्यासाठी राज्यातील दारू प्रेमींना आता अधिक मोल मोजावे लागणार आहे. एका बाजूला लाडक्या बहिणींची काळजी, दुसऱ्या बाजूला दारूचे वाढते दर – हे सध्याच्या सरकारचे नवे आर्थिक समीकरण ठरू लागले आहे.

## रेल्वेचा पुढाकार, शिक्षण क्षेत्र मागे का?

**वाचक लिहितात**

छत्रपती शिवाजी महाराज केवळ भारतीयांचेच नव्हे, तर परदेशातही आराध्य आहेत. अनेक देशांमध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रमांमध्ये शिवरायांची युद्धनीती, राज्यनीती इत्यादींचा समावेश आहे. शिवाजी महाराज केवळ हिंदवी स्वराज्याचे संस्थापक नव्हते, तर ते कुशल प्रशासक, पराक्रमी योद्धा आणि दूरदृष्टी असलेले शासक होते. ते जनकल्याण आणि आत्मनिर्भरतेचे प्रतीक आहेत.

त्यांची युद्धनीती, शासनपद्धती आणि धर्मनिरपेक्ष धोरण आजही प्रेरणादायी आहेत. त्यांच्या जीवनातून आणि कायार्तून विद्यार्थ्यांना नेतृत्वगुण, देशभक्ती आणि सामाजिक ऐक्य यांसारखी मूल्ये शिकायला मिळावी. या उद्देशाने मुंबई येथून ह्यभारत गौरव टुरिस्ट ट्रेन अंतर्गत छत्रपती शिवाजी महाराज सर्किट या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला आहे.

ही गाडी महाराष्ट्रात ५ दिवस फेरफटका मारणार असून रायगड, प्रतापगड, पन्हाळा अशा ऐतिहासिक गडांच्या जवळच्या रेल्वेस्थानकांवर तसेच शिवरायांच्या इतिहासाशी संबंधित अन्य ऐतिहासिक स्थळांजवळ थांबणार आहे.या अभिनव उपक्रमासाठी भारतीय रेल्वेचे अभिनंदन!

रेल्वे विभागाने शिवचरित्र प्रचारासाठी पुढाकार घेतला आहे, पण शिवरायांचा वसा पुढील पिढीमधे रुजविण्यासाठी शिक्षण क्षेत्रानेही पुढाकार घेण्याची वेळ आली आहे.

केवळ राज्य सरकारच नव्हे, तर केंद्र सरकारनेही प्राथमिक इयत्तेपासून पदव्युत्तर अभ्यासक्रमांपर्यंत शिवाजी महाराजांचे जीवन, कार्य व पराक्रम यांचा समावेश अभ्यासक्रमात करावा, ही सर्व शिवप्रेमींची इच्छा आहे.

■ दीपक जमनारे, वर्धा.

## नसांमध्ये साचलेले खराब कोलेस्ट्रॉल होईल कमी



आजकाल उच्च कोलेस्ट्रॉलची समस्या सामान्य झाली आहे. लोकांची बदलती जीवनशैली तसेच खाण्यापिण्याच्या चुकीच्या सवयी यामुळे ही समस्या उद्भवते. शरीरात कोलेस्टॉलची पातळी वाढल्याने अनेक गंभीर आजार होऊ शकतात. हृदयरोग, मज्जातंतूंचे आजार, हृदयविकाराचा झटका आणि स्ट्रोकसारखे गंभीर आणि जीवघेणे आजार होऊ शकतात. त्यामुळे शरीरात वाढत्या कोलेस्टेरॉलची समस्या वेळीच नियंत्रित करणे महत्त्वाचे आहे.

वाढत्या कोलेस्टेरॉलवर नियंत्रण ठेवण्यासाठी जीवनशैलीत काही बदल करणे आणि आहार सुधारणे आवश्यक आहे, अनेक प्रकरणांमध्ये यासाठी औषधे घ्यावी लागतात. मात्र काही घरगुती उपायांच्या मदतीने शरीरात साठलेले खराब कोलेस्टेरॉल बाहेर काढू शकतात.

उच्च कोलेस्ट्रॉलची समस्या असेल, तर ते नियंत्रित करण्यासाठी स्वयंपाकघरात असलेली एक पांढरी गोष्ट वापरावी लागेल.

**लसूण कोलेस्ट्रॉल साफ करेल**

वाढत्या कोलेस्ट्रॉलवर नियंत्रण ठेवण्यासाठी लसूण वापरू शकता. यासाठी लसूण तुपात भाजून खावा लागेल. तूप आणि लसूण एकत्र कोलेस्ट्रॉल कमी करण्यास मदत करतात. लसणात असलेले अँटी-ऑक्सिडंट्स आणि तुपात असलेले ओमेगा-३ फॅटी ॲसिड कोलेस्ट्रॉल कमी करण्यास मदत करतात. याशिवाय, तुपात भाजलेला लसूण आरोग्यासाठी बरेच फायदे प्रदान करते.

जर पचनाच्या समस्या असतील तर लसूण फायदेशीर ठरेल. विशेषतः तुपामध्ये ते भाजून खाल्ल्याने पचनाच्या समस्या दूर होण्यास खूप मदत होते. यामुळे बद्धकोष्ठता आणि आम्लपित्त यापासूनही आराम मिळतो. लसणात असे अनेक पोषक घटक आढळतात जे हृदय निरोगी ठेवण्यास मदत करतात. तुपात तळलेला लसूण खाल्ल्याने हृदयाशी संबंधित आजार दूर राहतात.

तुपात तळलेला लसूण खाल्ल्याने रोगप्रतिकारक शक्ती वाढते. ते शरीराचे संसर्गापासून संरक्षण करते. तसेच लसणात असलेले अँटी-फंगल आणि अँटी-बॅक्टेरियल गुणधर्म तुपासोबत मिसळल्यास सर्दी आणि खोकल्यापासून आराम मिळतो.

**पुरुषांसाठी फायदेशीर**

तुपात भाजलेले लसूण पुरुषांसाठी खूप फायदेशीर मानले जाते. नियमित सेवन केल्यास टेस्टोस्टेरॉनची पातळी वाढते आणि शुक्राणूंची संख्या वाढते.

■ ■ ■

**अशोकायन**

**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**



## डोळस विचार

अरे डोळस बांधवांनो
अंधांच्या समस्यांची
ठेवा थोडी जाणीव
बंद डोळ्याने चालून पहा
समजेल तुम्हा उणिव ...

असेल दृष्टी तर
दिसेल सृष्टी
म्हणवा नाही खोटा
मरणोत्तर नेत्रदान करून
अंधांना दृष्टी देण्यात
सांगा काय आहे तोटा ?

# वणवा बनून राज्यभर पसरताहे बच्चु कडूंचे आंदोलन

आसेगाव येथे टॉवरवर चढले कार्यकर्ते | चांदूर बाजार कडकडीत बंद | राज्यभर आंदोलनाला पाठिंबा | चौथ्या दिवशी आंदोलनकर्त्यांची प्रकृती खालावली









**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर बाजार,(दि.११)–** माजी आमदार बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी मोझरी येथे सुरू असलेले उपोषण आंदोलन आता तीव्र व निर्णायक वळणावर आले आहे. आंदोलनाला चौथा दिवस लागूनही राज्य शासनाने अद्याप कोणतीही ठोस दखल घेतलेली नाही. त्यामुळे कडू यांच्या गृह तालुक्यातील नागरिक, शेतकरी आणि कार्यकर्ते प्रचंड आक्रमक झाले असून आंदोलनाची धग संपूर्ण अमरावती जिल्ह्यात तसेच राज्यभर पोहोचू लागली आहे. आंदोलनाच्या चौथ्या दिवशी बच्चु कडूंसह इतर आंदोलकांची प्रकृती खालावल्याची माहिती आहे.

११ जून रोजी चांदूर बाजार शहरातील व्यापाऱ्यांनी बच्चू कडू यांच्या आंदोलनाला पाठिंबा दर्शवत दुपारी दोनपर्यंत आपली दुकाने बंद ठेवली. ही भूमिका शहरातील व्यापारी, नागरिक व सामाजिक संघटनांनी घेतल्याने आंदोलनाला व्यापक पाठिंबा मिळत आहे.

दरम्यान, चांदूर बाजार तालुक्यातील आसेगाव येथे आंदोलक शेतकऱ्यांनी थेट मोबाईल टॉवरवर चढून प्रशासनाचा विरोध दर्शवला. पोलीस प्रशासनाने तातडीने घटनास्थळी धाव घेत आंदोलकांना सुरक्षित खाली उतरवले आणि नोटीस देऊन सोडून दिले.



## २ वर्षीय मुलीसह उपोषण छेडू, कुटुंबाचा इशारा

पिंपरी पूर्णा येथील शेतकरी सागर सोनारे यांनी आपल्या पत्नी समीक्षा आणि दोन वर्षांच्या मुलगी नेत्रासह १२ जूनपासून आमरण आंदोलन सुरू करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. जोपर्यंत मागण्या मान्य होत नाहीत तोपर्यंत आम्ही आंदोलन थांबवणार नाही, असा ठाम पवित्रा त्यांनी घेतला आहे. त्यांनी याबाबतचे निवेदन तहसीलदार आणि पोलिस प्रशासनाला दिले असून, त्यांच्या धैर्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.



## महिला वर्गाचा सक्रीय सहभाग

बच्चू कडू यांच्या आंदोलनाला महिलांचा देखील मोठा पाठिंबा मिळत आहे. चांदूर बाजार तहसील कार्यालयात महिलांनी जोरदार आंदोलन केले आणि मागण्यांचे निवेदन तहसीलदारांना दिले. महिलांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, शासनाने जर मागण्या मान्य केल्या नाहीत तर आम्ही जलसमाधी घेण्यास देखील मागे–पुढे पाहणार नाही. सतत होत असलेल्या आंदोलनांमुळे पोलीस व प्रशासन यंत्रणा अडचणीत आली असून, काही ठिकाणी अधिकारी वेळेत पोहोचू शकले नाहीत. परिणामी, आंदोलन अधिक वेळ सुरू राहत असून, तणावाचे वातावरण निर्माण होत आहे.

## अन्यथा सरकारला सळो कि पळो करून सोडू; मनोज जरांगे पाटील



प्रहार पक्षाचे अध्यक्ष आणि माजी आमदार बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली मोझरी येथे सुरू असलेल्या उपोषण आंदोलनाला मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी थेट पाठिंबा व्यक्त करत सरकारला कडक इशारा दिला आहे. ङ्गबच्चूभाऊंनी केलेल्या मागण्या मान्य करा, अन्यथा सळो कि पळो करून सोडू,ङ्ग अशी स्पष्टता मनोज जरांगे पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व दोन्ही उपमुख्यमंर्त्यांना दिली आहे. सरकारच्या विरोधात या आरोपांसह, प्रशासकीय यंत्रणा सध्या संभ्रमात दिसते.

बच्चू कडू स्वत: उपोषण करत असताना प्रकृतीची काळजी घेण्याचा आग्रह मनोज जरांगे पाटील यांनी व्यक्त केला. जेव्हा मी उपोषणास बसलो होतो, तेव्हा तुम्ही मला तब्येतीची काळजी घ्या, असं सांगितलं होतं; आता मी तुम्हाला सांगतो, तुम्ही माझी काळजी घ्या, असे त्यांनी भावनिकपणे अभिव्यक्त केले. या आंदोलनाच्या चौथ्या दिवशी (दि. १२ जून) मनोज जरांगे पाटील यांनी थेट भेट घेऊन त्यांचे मूळ आणि ठाम शब्दांमध्ये सरकारला आव्हान दिले. त्यांनी सांगितले की, ङ्गया ठिकाणी अनेकजण येऊन भाषण ठोकून निघून जातात; पण ते पुरेसं नाही. प्रत्यक्ष रस्त्यावर उतरून परिस्थिती बदलायला हवी. शेतक?यांसाठी जीवाची बाजी लावणं सोपं नाही, त्यामुळे शासनाने त्वरीत दखल घ्यावी.मनोज जरांगे पाटील म्हणाले की, ङ्गबच्चू कडू आपल्या तालुक्यातीलच नेता नाहीत, ते संपूर्ण राज्यातील शेतकऱ्यांचे वकील आहेत. त्यांच्या मागण्यांमध्ये सर्व शेतकऱ्यांच्या हिताचे मुद्दे आहेत. कारण शेतकऱ्यांचे कर्ज, उत्पन्न, पाण्याशी संबंधीत समस्या, पीकविमा, सिंचन आणि रोजगारसंधी अशा अनेक बाबींचा समावेश आहे. या मागण्यांवर सरकारने त्वरित सकारात्मक पावले उचलली नाहीत, तर आंदोलन अधिक तीव्र होऊ शकते.

## महायुतीच सरकार शेतकऱ्यांच अस्तित्व संपवण्याच्या दिशेने ; रविकांत तुपकर



आज महाराष्ट्रातील शेतकरी मरणाच्या दारात उभा आहे, असे खुद्द एका कॅबिनेट मंत्र्याने विधानसभेच्या सभागृहात सांगितले आहे. असे असताना या राज्यातील सरकार शेतकऱ्यांचे अस्तित्व, चळवळ संपवण्याच्या दिशेने निघालेले आहे. इंग्रंजांपेक्षा भयंकर दादागिरी आणि दहशतीचे काम हे सरकार करत आहे. इंग्रज किमान ओळखू येत होते. मात्र, हि औलाद आपल्या शेजारची आहे आपल्यासारखीच दिसते. आपल्यात आले कि आपल्यासारखे बोलत आहे तिकडं गेलं कि त्यांच्यासारखे बोल्ट आहे. शत्रू नेमका कोण हे आपल्याला समजेनासे झाले आहे. बळीराजा जर आत्महत्या करतोय, गळफास करतोय आणि हे सरकार काही करायला तयार नाही. रोम हा देश ज्यावेळी जळत होता, त्यावेळी रोमचा राजा बिगुल वाजवत बसला होता. तशी या महाराष्ट्रातील सरकारची अवस्था असल्याची टीका क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे संस्थापक तथा माजी मंत्री रविकांत तुपकर यांनी केली.

# महसुल खात्याचे क्रांतीकारी निर्णय जिल्हास्तरावर त्वरीत राबविण्यात यावे

## पालकमंत्री बाकनकुळेंचे आदेश



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि.११) –** महाराष्ट्र शासनाने महसुल विभागात अभिनव धोरणे व उपक्रम जाहीर केले असून, त्याची जलद अंमलबजावणी अमरावती जिल्ह्यात व्हावी, असा ठाम संदेश महसुलमंत्री व पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी जिल्हा प्रशासनाला दिला आहे. या आदेशांतर्गत विविध योजना व निर्णय शेतकरी, सर्वसामान्य नागरिक व व्यवसायिकांपर्यत लवकरपुर्वी पोहोचावेत, असे त्यांनी सांगितले.

पालकमंत्री बावनकुळे यांनी सांगितले की, वाळू–रेती निर्गती धोरण–२०२५ अंतर्गत वाळूचे लिलाव पद्धतीत वितरण सुरू होईल, तसेच घरकुल बांधकामासाठी १० टक्के वाळू आरक्षित राहणार. ‘वन स्टेट, वन रजिस्ट्रेशन’ अंतर्गत राज्यात कुठल्याही उपनिबंधक कार्यालयात मालमत्तेची नोंदणी करता येईल. छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरांमार्फत नागरिकांच्या महसुली अडचणी दूर करण्यात येतील.

त्याचप्रमाणे सिंचन सुविधा, ‘जिवंत सातबारा’ मोहिमेतून शेतकऱ्यांसाठी वारस–नोंदीची सोय, एम–सँडचा अनिवार्य वापर, रस्त्यांवरील अतिक्रमण हटवण्यासाठी मोफत पोलीस बंदोबस्त यांसारख्या निर्णयांची अमलवारी लवकर करावी, असे निर्देश झाले आहेत. तहसिलदार व नायब तहसिलदारांनी शेतकऱ्यांची जमीन तात्काळ पाहणी करावी, प्रशासकीय अडथळे दूर करावेत, असा ईशारा देण्यात आला. मसलती, जन्म–मृत्यू बोगस प्रमाणपत्र रोखण्यासाठी सुधारित नियमांतर्गत घरबसल्या ई–मुद्रांक प्रमाणपत्र मिळावे; शैक्षणिक प्रमाणपत्रांसाठी मुद्रांक शुल्क माफी व विद्यार्थ्यांवरील ५०० रुपये स्टँपची अट रद्द; शेत्यांना विनामूल्य गाळ, माती, मुरुम; घरकुल बांधकामासाठी मोफत वाळूची रॉयल्टी; सलोखा योजनेला मुदतवाढ; शेती वादांचे कायमस्वरूपी निराकरण; ‘माझी जमीन, माझा हक्क’ अभियानासाठी राज्यस्तरीय समिती अशी महत्वाची योजना सूची तयार झाली आहे. मात्र, हे सर्व निर्णय जिल्हास्तरावर त्वरीत व पारदर्शक पद्धतीने राबवावे, नागरिकांना लाभ अखंड मिळावा आणि तक्रारी कमी होऊन प्रशासकीय कार्यक्षमता वाढावी, यासाठी जिल्हा प्रशासनाने तत्परपणे मागणीपत्र स्वीकारून अंमलबजावणीचे ठोस टप्पे आखावे, असा आग्रह पालकमंत्री यांनी व्यक्त केला. त्यांच्या या निर्देशांमुळे महसुल विभागाच्या उपक्रमांना गती लागणार असून, स्थानिक विकासाला नवी चालना मिळणार असल्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# मेळघाटात पुन्हा एकदा स्तनदा मातेचा मृत्यू

## आरोग्य विभागाच्या हलगर्जीपणामुळे रुग्णाचा मृत्यू | १२ दिवसांची चिमुरडी झाली अनाथ

**महासागर प्रतिनिधी**
**चुरणी/अचलपूर,(दि.११)–** अचलपूर येथील महिला रुग्णालयात रवीना केशव जामकर, ( वय २७, रा. नागापूर, ता.चिखलदरा) या गर्भवती महिलेचा मृत्यू झाला. आरोग्य विभागाच्या गंभीर हलगर्जीपणामुळे हा मृत्यू झाला असल्याचा आरोप मृतक महिलेच्या कुटुंबीयांनी केला आहे. या घटनेमुळे १२ दिवसांची चिमुरडी अनाथ झाली आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. रुग्णालय प्रशासनावर थेट आरोप करत दोषींवर कारवाईची मागणी केली आहे.

रविना जामकर यांची अकरा दिवसांपूर्वी सुरक्षित प्रसूती झाली होती. मात्र गेल्या पाच दिवसांपासून त्यांची प्रकृती बिघडल्याने स्थानिक पातळीवर प्राथमिक उपचार सुरू होते. १० जून रोजी प्रकृती अत्यंत गंभीर झाल्याने त्यांना अचलपूरच्या महिला व बाल रुग्णालयात तातडीने हलवण्यात आले. मात्र उपचार सुरू होऊन अवघ्या अर्ध्या तासातच त्यांचा मृत्यू झाला. सदर मृत्यूचे नेमके कारण शवविच्छेदन अहवालानंतर स्पष्ट होईल, असे डॉक्टरांचे म्हणणे आहे. मात्र, या मृत्यूमुळे प्रशासनाने मेळघाटात राबवलेल्या मातामृत्यू प्रतिबंधक उपाययोजनांवर पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. मेळघाटातील अत्यंत दुर्गम भागांमध्ये अजूनही आरोग्य सुविधा पोहोचण्यात अडथळे येत आहेत. प्रसूतीपूर्व व प्रसूतिनंतरच्या काळात आवश्यक वैद्यकीय देखभालीचा अभाव, वेळेवर उपचार न मिळणे, अपुऱ्या सुविधा, तसेच जागरूकतेचा अभाव यामुळे दरवर्षी अशा दुर्दैवी घटना घडत आहेत.

याआधीही धारणी व सलोना परिसरात घडलेल्या बाल व मातामृत्यूच्या घटनांची चौकशी पूर्ण झालेली नसताना, रविना जामकर यांच्या मृत्यूने पुन्हा एकदा आरोग्य यंत्रणांचे अपुरेपण समोर आणले आहे.

स्थानिक नागरिकांमध्ये संतापाची लाट असून, या घटनेची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी होत आहे. तसेच, मातामृत्यू रोखण्यासाठी केवळ योजनांची घोषणा नव्हे तर क्षेत्रीय अंमलबजावणीवर भर देण्याची गरज असल्याचे सामाजिक कार्यकर्त्यांचे मत आहे.



### मृतदेह ताब्यात घेण्यास नकार

रवीना जामकर यांच्या मृत्यूनंतर त्यांचा मृतदेह अचलपूर उपजिल्हा रुग्णालयातून कुटुंबीयांना देण्याची प्रक्रिया सुरू असताना, मृतक महिलेची आई शांतीबाई हरीशचंद्र कास्देकर, (रा. वझ्झर) यांनी स्पष्ट शब्दांत मृतदेह ताब्यात घेण्यास नकार दिला. त्यांनी सांगितले की, ‘जोपर्यंत संबंधित दोषी आरोग्य कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई होत नाही, तोपर्यंत मृतदेह स्वीकारणार नाही.‘

गौरखेडा बाजार येथील सिएचओ यांना नागापूर येथील स्तनदा मातेची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती दिली. त्यानंतर सिएचओ तात्काळ मातेच्या घरी पोहचल्या मातेची प्रकृती चिंताजनक असल्याने तात्काळ रुग्णवाहिकेच्या चालकाला फोन लावला व मातेला रेफर केले मात्र उपचारादरम्यान स्तनदा मातेचा मृत्यू झाल्याची माहिती मिळाली.

**डॉ पायल ताते, वैद्यकीय अधिकारी गौरखेडा बाजार**

सदर मातेला उपचारासाठी गंभीर अवस्थेत दाखल केले होते. पाच दिवसापासून महिलेची प्रकृती खराब असल्याची माहिती मिळाली महिलेला जवळपास १०८ च्या वर ताप होता. उपचार करत असतांनाच त्या मातेचा मृत्यू झाला. सदर मातेचे शवविच्छेदन करण्यात येणार आहे. त्यानंतर मृत्यू नेमका कश्याने झाला याबाबतचे कारण समोर येणार आहे.

**डॉ विजय सिरसमकर,**
**वैद्यकीय अधीक्षक, महिला व बाल रुग्णालय.**

सदर मातेचा मृत्यू झाल्याची माहिती मिळाली या मृत्यूला जो कोणी अधिकारी, कर्मचारी जबाबदार असेल त्यांची चौकशी करून कडक कारवाई करण्यात यावी. मेळघाटात जेणेकरून असा प्रकार पुन्हा घडू नये याकरिता दोषींवर कारवाई करण्याची मागणी जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांकडे केली आहे.

**केवलराम काळे,**
**आमदार मेळघाट विधानसभा.**

# अचलपूर नगर परिषद निवडणुकीची तयारी सुरू

## प्रभाग रचनेवर चर्चांना वेग | संभाव्य उमेदवार जनसंपर्कात व्यस्त | आयोगाच्या अधिकृत घोषणेकडे लक्ष



**मो. अजहरुद्दीन**
**अचलपूर, (दि.११)–** गेल्या चार वर्षांपासून रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना अखेर चालना मिळण्याची चिन्हं दिसू लागली आहेत. सवीच्च न्यायालयाचा हस्तक्षेप व राज्य शासनाने १० जून रोजी घेतलेल्या महत्त्वपूर्ण निर्णयानुसार, नगरपरिषद, नगरपालिका, जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुकांची प्रक्रिया लवकरच सुरू होणार आहे. या निर्णयामुळे अचलपूर शहरात पुन्हा राजकीय हालचालींना गती मिळाली असून, प्रभाग रचना आणि संभाव्य उमेदवारांच्या हालचालींवर नागरिकांचे लक्ष केंद्रित झाले आहे.

शहरातील विविध प्रभागांमध्ये कोणत्या भागांचा समावेश होणार, प्रभागांचे आरक्षण कसे लागणार, अनुसूचित जाती–जमाती, महिला आरक्षण कसे विभागले जाणार, याबाबत देखील नागरिकांमध्ये उत्सुकता आहे. काही सामाजिक संघटना व स्थानिक नागरिकांनी पारदर्शक व न्याय्य प्रभाग रचनेची मागणी प्रशासनाकडे केली आहे. राजकीय पक्षांमध्येही अंतर्गत बैठकांना सुरुवात झाली आहे. शिवसेना, काँग्रेस, भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यात आगामी निवडणुकीसाठी रणनीती आखण्याचे काम सुरू आहे. स्थानिक पातळीवर असलेल्या गट–तटांमध्येही चाचपणी सुरू आहे.

शहरात निवडणुकीचे वातावरण तयार होत असून, नागरिक आता राज्य निवडणूक आयोगाच्या अधिकृत कार्यक्रमाची वाट पाहत आहेत. एकदा निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला की, अचलपूरमध्ये निवडणुकीचे वातावरण तापेल, आणि जोरदार प्रचाराला सुरुवात होईल, अशी शक्यता वर्तवली जात आहे. निवडणुका केवळ राजकीय नव्हे, तर स्थानिक विकासाच्या दृष्टीनेही महत्त्वाच्या आहेत. त्यामुळे जनतेची अपेक्षा आहे की, नव्या प्रभाग रचनेनंतर अचलपूर शहराचा सर्वांगीण विकास सुनिश्चित होईल.

### नविन प्रभाग रचना की, जैसे थे!

शासनाच्या निर्देशानुसार, सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये नव्याने प्रभाग रचना (वॉर्ड संरचना) केली जाणार असून, नगरपरिषद क्षेत्रात दोन सदस्यीय प्रभाग प्रणाली लागू करण्यात येणार आहे. २०१७ मध्ये अचलपूर नगर परिषदेमध्ये ३९ नगरसेवकांची निवड झाली होती. यंदा ही संख्या व प्रभाग रचना कायम राहणार की नव्याने बदल होणार, याबाबत सध्या चर्चांना उधाण आले आहे. मात्र, राज्य निवडणूक आयोगाकडून अद्याप अधिकृत घोषणा झालेली नाही.

### गावपुढारी लागले कामाला

दरम्यान, गावपुढारी, राजकीय इच्छुकांनी जनसंपर्क मोहिमा सुरू केल्या असून, विविध सामाजिक उपक्रम, सार्वजनिक कार्यक्रम आणि समाजसेवेच्या माध्यमातून जनतेमध्ये उपस्थिती दर्शवली जात आहे. महिला, युवक, सेवाभावी संस्था, व्यापारी वर्ग यांच्याशी थेट संपर्क साधत संभाव्य उमेदवार मतदारांवर आपली पकड मजबूत करताना दिसत आहेत.

# कासवगतीने सुरु असलेले उड्डाणपुलाचे काम तातडीने करा!

## शिवसेनेचे माजी नगरसेवक प्रविण हरमकर यांची मागणी



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,(दि.११)–** शहरातील हिंदू–मुस्लिम मुख्य बाजारपेठेला जोडणा?या पुलाचे काम गेल्या अनेक वर्षांपासून कासवगतीने सुरु आहे. ज्यामूळे ते पूर्ण झालेले नाही. या कामाबाबत अनेक वेळा जनप्रतिनिधींकडून प्रशासनाला पत्रव्यवहार करण्यात आला तसेच स्थानिक नागरिकांनीही वारंवार तक्रारी केल्या, मात्र अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. परिणामी या भागातील नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. शिवसेना शहर प्रमुख तथा मनपाचे माजी विरोधी पक्षनेता प्रवीण हरमकर यांनी बुधवारी सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता यांना निवेदन दिले केले.

निवेदनाप्रमाणे, पुलाचे भूमिपूजन होऊनही ठेकेदार कामास सुरुवात करत नाही आणि प्रशासन याकडे दुर्लक्ष करत आहे. यामुळे नागरिकांच्या मनात असंतोष आहे तसेच आमदार व खासदारांची नाहक बदनामी होत आहे. हे पूर्णतः प्रशासकीय अपयश असून प्रशासनाने याबाबत कठोर कारवाई करावी, अशी मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्यावतीने करण्यात आली. या पुलामुळे दोन समुदायांमध्ये तेढ निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे काम त्वरित सुरू करून पूर्ण करावे, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला. या निवेदनप्रसंगी शहरप्रमुख प्रवीण हरमकर, महिला आघाडीच्या शहराध्यक्ष राजश्री जटाळे, उपशहरप्रमुख पंजाबराव तायवाडे, विभागप्रमुख गोविंद दायमा, प्रभागप्रमुख मनीष रामावत, माजी प्रमुख प्रमोद वानखडे, राजू हिरे, युवासेना सरचिटणीस श्रीकांत शर्मा, जयंत इंगोले, प्रवीण देशमुख, विनोद शर्मा, संजय धुळे, संदीप मानेकर, विजय बेंनोडकर, आनंद राठी, अमित मेहरा, सलाम, निकेश शर्मा, लाला अंजुम यांच्यासह अनेक शिवसैनिक उपस्थित होते.



# 'हाऊसफुल ५' १०० कोटींच्या क्लबमध्ये?

२०२५ हे वर्ष बॉलीवूड अभिनेता अक्षय कुमारसाठी लाभदायी ठरले आहे. या वर्षी त्याचा तिसरा चित्रपट प्रेक्षकांकडून खूप प्रेम मिळवत असल्याचे दिसून येत आहे. साजिद नाडियाडवालाचा हिट फ्रँचायझी चित्रपट 'हाऊसफुल ५' अलिकडेच प्रदर्शित झाला. यावेळी नाडियाडवालाने चित्रपटाला सर्वोत्कृष्ट बनवण्यात कोणतीही कसर सोडलेली नाही. चित्रपट वेगवेगळ्या क्लायमॅक्ससह प्रदर्शित झाला. रिलीज होण्यापूर्वीच त्याबद्दल बरीच चर्चा होती. यात अक्षय कुमार, अभिषेक बच्चन आणि रितेश देशमुख यांच्यासह अनेक प्रसिद्ध चेहरे आहेत. चित्रपटाला आयएमडीकडून ४.० रेटिंग मिळाले. सुरुवातीला प्रेक्षकांकडून संमिश्र प्रतिसाद मिळाला. पण आता तो प्रेक्षकांना आकर्षित करण्यात यशस्वी होताना दिसत आहे. 'हाऊसफुल'च्या या पाचव्या भागात अनेक खास गोष्टी पाहायला मिळत असून मागील भागातील काही दृश्ये 'हाऊसफुल ५' मध्ये दाखवण्यात आली आहेत. यामुळे कथेत एक कनेक्शन दिसते. बॉबी देओलच्या प्रवेशाने थिएटरमध्ये लोक आश्चर्यचकित होतात. तो चित्रपटाच्या क्लायमॅक्समध्ये महत्त्वाची भूमिका बजावतो कारण आणि त्याच्या एका घोषणेने जहाजावर उपस्थित असणाऱ्या सर्व लोकांचे नशीब उजळते. अर्थात चित्रपटाच्या कथेची आणि सस्पेन्सची माहिती तुम्हाला 'हाऊसफुल ५' पाहिल्यानंतरच मिळेल.

अक्षय कुमारच्या या चित्रपटाने पहिल्या दिवशी भारतात २४ कोटींचा गल्ला जमवला. शनिवारी कलेक्शन वाढले आणि हा आकडा ३१ कोटींवर पोहोचला. रविवारीही त्याने चांगली कामगिरी केली. यानंतर हा चित्रपट आता १०० कोटींच्या अगदी जवळ पोहोचला आहे.

# ग्लॅम वर्ल्ड

# वाद चिघळला आणि...

दक्षिणेतील सुपरस्टार कमल हासन यांचा बहुप्रतिक्षित 'ठग लाईफ' देशभरात प्रदर्शित झाला असला तरी वादांमुळे तो कर्नाटकात प्रदर्शित होऊ शकलेला नाही. या चित्रपटाला कर्नाटकात मोठ्या प्रमाणात निषेध नोंदवला गेला. पुढे तो इतका वाढला की थिएटर मालकांना धमक्या येऊ लागल्या. परिस्थितीचे गांभीर्य पाहून कर्नाटक थिएटर असोसिएशनने सुरक्षेची मागणी करत सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. परंतु न्यायालयाने त्यावर त्वरित सुनावणी घेण्यास नकार दिला. त्यामुळेच ही बाब सध्या चांगलीच चर्चेत आहे. सिनेमागृहांना सुरक्षा प्रदान करण्याची मागणी मान्य झाली असती तर चित्रपटाचे सुरक्षित प्रदर्शन शक्य झाले असते. मात्र तसे न झाल्याने मोठा फटका सहन करावा लागत आहे, असे म्हणावे लागेल.

या याचिकेवर सुनावणी करताना न्यायमूर्ती प्रशांत कुमार मिश्रा आणि न्यायमूर्ती मनमोहन यांच्या खंडपीठाने तात्काळ दिलासा देण्यास नकार दिला आणि याचिकाकर्त्यांना प्रथम कर्नाटक उच्च न्यायालयात जाण्याचा सल्ला दिला. 'तुम्ही प्रथम राज्याच्या उच्च न्यायालयाशी संपर्क साधावा. आम्ही या प्रकरणात त्वरित हस्तक्षेप करू शकत नाही...' असे मत त्यांनी व्यक्त केले.

'ठग लाईफ' वरील हा वाद कसा सुरू झाला हे वाचक जाणतात. कमल हासन यांनी चित्रपटाच्या प्रमोशनदरम्यान कन्नड भाषेबद्दल आक्षेपार्ह टिप्पणी केली, आणि तेव्हापासून हा मुद्दा चिघळला. या टिप्पणीनंतर कर्नाटकात त्यांच्या विरोधात निदर्शने सुरू झाली आणि अनेक संघटनांनी त्यांच्या चित्रपटाच्या प्रदर्शनावर बंदी घालण्याची मागणी केली. या प्रकरणी अभिनेत्याला माफी मागण्यास सांगण्यात आले होते, परंतु त्यांनी माफी मागितली नाही. त्यामुळे कर्नाटकात त्यावर बंदी घालण्यात आली. त्याचमुळेच कमल हासन यांचा हा चित्रपट पाच जून रोजी देशभरात प्रदर्शित झाला असला तरी कर्नाटकातील प्रेक्षकांपुढे तो येऊ शकलेला नाही.





# ...मग ही तर पर्वणीच

'बाहुबली' आणि 'आरआरआर' सारख्या सुपरहिट चित्रपटांनंतर आता चाहते एसएस राजामौलीच्या पुढच्या चित्रपटाची वाट पाहत आहेत. सध्या ते महेश बाबू आणि प्रियांका चोप्रा यांच्यासोबत एक जंगल ॲडव्हेंचर बनवत आहे. ताजी बातमी म्हणजे यात 'रहना है तेरे दिल में' फेम अभिनेता आर माधवनचा प्रवेश निश्चित झाला आहे.

आर माधवन या १,००० कोटींच्या महाकाव्यात्मक चित्रपटात अत्यंत मजबूत भूमिका साकारू शकतो, असे म्हटले जात आहे. तथापि, निर्मात्यांनी अद्याप याची पुष्टी केलेली नाही. पृथ्वीराज सुकुमारन देखील या चित्रपटात आहे. तेव्हा माधवन यात दिसला तर राजामौली आणि माधवन एकत्र काम करण्याची ही पहिलीच वेळ असेल. स्वाभाविकच प्रेक्षक या पर्वणीची वाट पहात आहेत.

राजमौली यांच्या या बहुचर्चित चित्रपटाबद्दल प्रचंड उत्सुकता असली तरी त्याबद्दल सर्व काही अतिशय गुप्त ठेवले जात आहे. हा एक ॲक्शन–ॲडव्हेंचरपट असेल, एवढीच माहिती समोर येत आहे. राजामौली यांनी २०२४ मध्येच केनियामध्ये एक लोकेशन पाहून ठेवले होते. कदाचित आता या चित्रपटाचा काही भाग तेथे शूट केला जाऊ शकतो. या चित्रपटाचे संगीत एमएम कीरावानी यांच्या हाती आहे. यापूर्वी त्यांनी 'आरआरआर' मधील 'नाटू नाटू' साठी ऑस्कर जिंकला आहे.

या व्यतिरिक्त आर. माधवन 'आप जैसा कोई' या प्रोजेक्टवर देखील काम करत आहे. यामध्ये फातिमा सना शेख त्याच्यासोबत पडदा शेअर करत आहे. हा चित्रपट नेटफ्लिक्सवर प्रदर्शित होणार आहे. तेव्हा आर. माधवन यांच्या चाहत्यांसाठी ही आनंदाची बाब ठरु शकते.

# कसा असेल 'अखंड २'

नंदमुरी बालकृष्ण आगामी चित्रपटांमुळे सध्या चांगलेच चर्चेत आहेत. काही हिट चित्रपटांच्या सिक्वेलची सर्वांनाच उत्सुकता आहे. त्यांचा 'अखंड' २०२१ मध्ये प्रदर्शित झाला होता. प्रेक्षकांना त्यांचे काम खूप आवडले होते. आता ते त्याच्या सिक्वेलने सर्वांचे मन जिंकण्यास सज्ज आहेत. 'अखंड २' प्रदर्शित होण्यासाठी सज्ज असून निर्मात्यांनी टीझर रिलीज करून सगळ्यांनाच आश्चर्यचकित केले आहे.

ज्येष्ठ तेलुगू अभिनेता नंदमुरी बालकृष्ण आणि दिग्दर्शक बोयापती श्रीनु यांनी 'अखंड २' साठी पुन्हा एकदा हातमिळवणी केली आहे. यापूर्वी दोघांनीही तीनदा प्रोजेक्टवर काम केले आहे. अशातच त्यांच्या आगामी चित्रपटाचा अद्भुत टीझर रिलीज झाला आहे.



'अखंड २' ची निर्मिती राम अचंता आणि गीपचंद अचंता यांनी केली आहे. प्रदर्शित झालेल्या टीझरमध्ये बालकृष्ण पूर्णपणे नवीन अवतारात दिसत असून त्यामध्ये आध्यात्मिक प्रतिमेसह जोरदार ॲक्शन दिसून येते. यामध्येही त्यांचे पात्र पहिल्या भागात होते तसेच दिसले आहे. टीझर पाहिल्यानंतर सोशल मीडियावरील वापरकर्त्यांनी भरघोस प्रतिक्रिया दिल्या असून अभिनेत्याच्या कामाचे कौतुकही केले आहे.

'अखंड २' चा टीझर पाहिल्यानंतर, चित्रपटप्रेमींमध्ये याबद्दलची उत्सुकता वाढली आहे. नंदमुरीच्या चाहत्यांनीही टीझरला पसंती देण्यास सुरुवात केली आहे. रिलीज तारखेबद्दल बोलायचे झाले तर प्रेक्षकांना चित्रपटासाठी जास्त वाट पाहावी लागणार नाही. हा चित्रपट २५ सप्टेंबर २०२५ रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित होणार आहे. त्याच्या पहिल्या भागाबद्दल बोलायचे तर 'अखंड' ने बॉक्स ऑफिसवर १०० कोटींहून अधिक कमाई केली होती. आता त्याचा सिक्वेल कशी कामगिरी करतो हे पाहणे मनोरंजक असेल.

# हिनाचे हात मेहंदीने सजले

'ये रिश्ता क्या कहलाता है' मधील 'अक्षरा' म्हणजेच हिना खानने प्रियकर रॉकी जयस्वालशी अचानक लग्न करून सर्वांनाच आश्चर्यचकित केले. तिने रॉकीबरोबर साधेपणाने आणि कोणत्याही डामडौलाशिवाय लग्न केले असले तरी त्यांची झलक सोशल मीडियावर प्रचंड वेगाने पसरली.

हिना खान आणि रॉकी जयस्वाल हे लोकप्रिय टीव्ही जोडपे आहे. दोघांनीही नेहमीच परस्परांमधील नाते सार्वजनिकरित्या स्वीकारले आहे. पण ते अचानक आणि इतक्या साध्या पद्धतीने लग्न करतील असे कोणालाही वाटले नव्हते. मात्र त्यांनी अगदी साध्या पद्धतीने लग्न केले. इतकेच नाही तर या अभिनेत्रीने लग्नाचा लूकही अगदी मिनिमलिस्ट ठेवला होता.

मात्र आता तिने लग्नाचा लूक मिनिमलिस्ट का ठेवला हे सांगितले. तिने लग्नाचे नवीन फोटो शेअर केले असून त्यात ती खूप सुंदर दिसते. तिने लग्नाच्या दुपट्ट्यावर 'हिना आणि रॉकी' असे लिहिलेले दाखवले आहे. हे फोटो शेअर करताना हिनाने लेहेंगा, भारी दागिने आणि भारी मेकअपऐवजी लग्नाचा साधा लूक का निवडला हे सांगितले. तिने कॅप्शनमध्ये लिहिले आहे की, या सुंदर दिवशी मी मिनिमलिस्ट राहायला हवे होते तितके राहू शकले, याचा आनंद आहे. कोणताही हेवी लेहेंगा नाही, जास्त मेकअप नाही किंवा जड दागिने नाहीत, मोठी केशरचना नाही किंवा जास्त ॲक्सेसरीजही नाहीत. मला यापैकी काहीही करण्याची गरज नव्हती कारण मी आतून समाधानी होते. माझ्यासाठी तेवढेच महत्त्वाचे होते...!




हिना खानने लग्नात मनीष मल्होत्राने डिझाइन केलेली ओपल ग्रीन रॉ सिल्क साडी नेसली होती. त्यामध्ये ती कमालीची सुंदर दिसत होती. तिच्या लूकला कमीत कमी दागिन्यांनी स्टाईल केले गेले होते. रॉकीने मनीष मल्होत्राने डिझाइन केलेला ऑफ व्हाइट कुर्ता–पायजमा घातला होता.

# थोडी वाट बघा

बॉलिवूडची प्रसिद्ध अभिनेत्री नीना गुप्ता आपल्या वाढदिवसाच्या जंगी पार्टीमुळे, त्यातील पेहरावामुळे प्रकाशझोतात राहिल्या. यात मुलगीही मागे नाही. डिझायनर मसाबा गुप्ता नुकतीच आई झाली आहे. काही महिन्यांपूर्वी तिने पहिल्या मुलाचे स्वागत केले. पण आता दुसऱ्या गरोदरपणाच्या बातमीमुळे पुन्हा एकदा तिच्याबाबत चर्चा होत आहे. अलीकडेच तिचा एक व्हिडिओ व्हायरल झाला असून ती गरोदर असल्याच्या अटकळींना उधाण आले आहे. चाहत्यांपासून माध्यमांपर्यंत सर्वजण मसाबा गुप्ता पुन्हा आई होणार आहे का? हा एकच प्रश्न विचारत आहेत.

नुकतेच सोनम कपूरने तिच्या ४० व्या वाढदिवसानिमित्त एका पार्टीचे आयोजन केले होते. त्यावेळी बॉलिवूड आणि फॅशन इंडस्ट्रीतील अनेक प्रसिद्ध व्यक्ती उपस्थित होत्या. करीना कपूर, जान्हवी कपूर,



शिल्पा शेट्टी आणि इतर मोठ्या स्टार्सबरोबर मसाबा गुप्ता देखील पती सत्यदीप मिश्रासोबत पार्टीला पोहोचली होती. हे जोडपे पार्टीतून बाहेर पडले आणि त्यांनी पापाराझींसमोर पोज दिली तेव्हा लोकांचे लक्ष मसाबाच्या लूककडे गेले. त्यानंतर ती पुन्हा एकदा आई होणार असल्याची बातमी पसरली.

पार्टीत मसाबाने काळ्या रंगाचा बॉडीकॉन ड्रेस घातला होता आणि त्यावर सुंदरसे जॅकेट देखील घातले होते. मात्र या पोशाखात तिचे पोट थोडे मोठे दिसत होते. ते पाहून अनेकांनी ती दुसऱ्यांदा गर्भवती असल्याचा अंदाज बांधला. व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होताच मसाबाच्या गरोदरपणाबद्दल बोलले जाऊ लागले. काही वापरकर्त्यांनी तिचे थेट अभिनंदन करण्यास सुरुवात केली तर काहींनी याला केवळ गैरसमज म्हटले. तथापि, आतापर्यंत मसाबा किंवा तिच्या कुटुंबाकडून या विषयावर कोणतेही अधिकृत विधान आलेले नाही. त्यामुळे चाहत्यांनी आनंदाच्या बातमीसाठी थोडी वाट पहावी हे उत्तम.

# नावात बदल?

विवेक अग्निहोत्री चित्रपटांमधून महत्त्वाचे विषय मांडण्यासाठी ओळखले जातात. 'द काश्मीर फाइल्स'च्या यशानंतर त्यांना असे अनेक चित्रपट बनवण्याची संधी मिळाली असून सध्या ते 'दिल्ली फाइल्स'वर काम करत आहेत. मध्यंतरी याची घोषणा करण्यात आली होती. पण आता चर्चा आहे की, अग्निहोत्री यांच्या आगामी चित्रपटाचे नाव पूर्वी सांगितलेल्या नावासारखे नसेल.

'द ताश्कंद फाइल्स' आणि 'द काश्मीर फाइल्स' सारख्या चित्रपटांसाठी प्रसिद्ध असणारे हे चित्रपट निर्माते आता चित्रपटाचे नाव बदलण्याची योजना आखत आहेत. मग प्रश्न असा उद्भवतो की, सर्व गोष्टी निश्चित झाल्यानंतर चित्रपटाचे शीर्षक बदलण्याची गरज का पडली? हा प्रश्न अद्याप तरी अनुत्तरित आहे.

विवेक अग्निहोत्री यांना पुढील चित्रपटाचे नाव 'द बंगाल फाइल्स' असे ठेवता येईल. यामागील कारण म्हणजे चित्रपटाची संपूर्ण कथा बंगालच्या इतिहासावर आधारित असणार आहे. अशा परिस्थितीत दिल्लीचे नाव कथेशी जुळणार नाही. विवेक अग्निहोत्री यांनी नुकतेच त्यांच्या इंस्टाग्राम स्टोरीवर एक फोटो शेअर केला आणि लिहिले की, 'तुम्हापैकी अनेकांनी 'द दिल्ली फाइल्स' किंवा 'द बंगाल फाइल्स' या नावावर प्रतिक्रिया शेअर केली आहे. मात्र आता माझ्याकडे एक मोठी अपडेट आहे, पण मी आत्ता त्याबद्दल माहिती देणार नाही. त्यासाठी तुम्ही वाट पाहा.'



या चित्रपटाचा टीझर आधीच प्रदर्शित झाला आहे. त्यात बंगालमधील एक दुखद घटना दाखवण्यात आली आहे. चित्रपटात मुख्य भूमिका साकारणारा अभिनेता मिथुन चक्रवर्तीची झलकही त्यात पाहायला मिळते. हा अभिनेता जळलेल्या जिभेने भारतीय संविधानाची प्रस्तावना वाचत असल्याचे टीझरमध्ये बघायला मिळाले. यावरूनच त्याला काही वेदनादायक घटनांना सामोरे जावे लागले आहे, हे स्पष्ट होते. चित्रपटाच्या प्रदर्शन तारखेबद्दल बोलताना, निर्मात्यांनी २०२५ च्या अखेरीस तो मोठ्या पडद्यावर आणण्याची योजना आखली असल्याचे स्पष्ट केले. त्यात अनुपम खेर आणि पल्लवी जोशी मुख्य भूमिकेत दिसतील. मात्र सध्या सर्वांना अग्निहोत्रींच्या नावाच्या घोषणेची उत्सुकता आहे.

# येतो आहे 'बिग बॉस १९'

चाहते टीव्हीवरील लोकप्रिय रिॲलिटी शो 'बिग बॉस'च्या नवीन सीझनची आतुरतेने वाट पाहत आहेत. 'बिग बॉस' चाहत्यांना होस्ट म्हणून सलमान खान खूप आवडतो. एकंदरच सध्या 'बिग बॉस १९' बद्दल चर्चा सुरू असून तो आतापर्यंतचा सर्वात मोठा सीझन असेल असे म्हटले जात आहे. हा शो सुमारे पाच महिने चालेल. निर्मात्यांनी स्पर्धकांशी संपर्क साधण्यास सुरुवात केली आहे. अपडेट असे की, निर्मात्यांनी शोसाठी एका प्रसिद्ध युट्यूबरशी संपर्क साधला आहे.

'बिग बॉस १९' बद्दल सुरुवातीला सोशल मीडियावर म्हटले जात होते की यावेळी कोणत्याही युट्यूबर किंवा सोशल मीडिया स्टार्सशी संपर्क साधला जाणार नाही. तथापि, आता दिसते की ती फक्त अफवाच होती कारण एका प्रभावशाली व्यक्तीचे नाव सतत या शो शी जोडले जात आहे. मुख्य म्हणजे तो तुरुंगवास आणि घटस्फोटामुळे चर्चेत राहिलेला आहे.




'बिग बॉस' च्या इंस्टाग्राम पोस्टनुसार, सलमान खानच्या या शोसाठी 'फ्लाइंग बीस्ट' नावाचे चॅनल चालवणाऱ्या युट्यूबरला ऑफर देण्यात आली आहे. तो कधीकधी घटस्फोटाच्या अफवांमुळे चर्चेत येतो तर कधी अन्य एखाद्या कारणासाठी त्याच्या नावाची चर्चा असते. एकदा तर तो वाढदिवस साजरा करण्यासाठी तुरुंगात गेला होता. तर हा युट्यूबर दुसरा तिसरा कोणी नसून गौरव तनेजा आहे. त्यालाच 'बिग बॉस' ची ऑफर देण्यात आली आहे. तथापि, अद्याप यासंबंधीची कोणतीही अधिकृत पुष्टी झालेली नाही.

# महायुती म्हणून एकत्र लढणार

## युतीबाबत चंद्रशेखर बावनकुळेंचे विधान

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. ११ :** महाराष्ट्रात लवकरच स्थानिक स्वराज्य संस्थानच्या निवडणुका पार पडणार आहेत. या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्वच पक्षांनी जोरदार तयारी देखील सुरू केली आहे. या निवडणुका महायुती एकत्र लढणार की वेगवेगळे लढणार यावर महसूल मंत्री व भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी मोठे विधान केले आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थानच्या निवडणुकीतील युतीबाबत बोलताना चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले, राज्यातील सर्व निवडणुका आम्ही एकत्र महायुती म्हणून लढणार आहोत.



**महायुती म्हणून आम्ही निवडणूक लढणार**

आमची भूमिका पक्की आहे, महायुती म्हणून आम्ही निवडणूक लढणार आहोत. मात्र, एखाद्या ठिकाणी जिथे शक्य नाही तिथे मैत्रीपूर्ण लढत होईल, असे विधान राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे. चंद्रशेखर बावनकुळे यांनी केलेल्या विधानाला मुख्यमंत्र्यांनी दुजोरा दिला आहे.

तर त्या ठिकाणी मैत्रीपूर्ण लढत होईल. मात्र इतर ठिकाणी युतीत निवडणुका लढल्या जातील, त्यामुळे संभ्रम बाळगण्याची गरज नाही.

दरम्यान, अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे नेते प्रफुल्ल पटेल यांनी युतीबाबत बोलताना म्हटले की, स्थानिक स्वराज्य संस्थानच्या निवडणुका आम्ही एकत्र लढणार आहोत, शक्य असेल तिथे युती केली जाईल. मात्र, शक्य नसेल तिथे आपण आपल्या ताकदीवर लढू. आतापासूनच कार्यकर्त्यांनी तयारीला लागले पाहिजे. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची घोषणा लवकरच होण्याची शक्यता आहे.

याबाबतचे आदेश आम्ही पक्षातील नेत्यांना आणि कार्यकर्त्यांना दिले आहेत.

आमचे स्थानिक पातळीवरील कार्यकर्ते एकमेकांशी याबाबत चर्चा करत आहेत. जर एखाद्या ठिकाणी एखाद्या जागेवरून वाद निर्माण झाला

अलीकडेच राज्य सरकारने महापालिकांना प्रभाग रचना करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे आता प्रशासनाकडूनही या निवडणुकांची तयारी केली जात आहे. त्यामुळे या निवडणुका लवकरच जाहीर होण्याची शक्यता आहे.

*राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा बिगुल वाजणार असून, पुढील काही महिन्यातच या निवडणुका होणार आहेत. महायुतीत सहभागी तीन पक्षात विसंवाद असल्याची चर्चा सुरू असताना अजित पवार यांनीही आपण महायुतीत जागेचे व टप करून लढू असे स्पष्ट केले. दुसरीकडे, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी देखील कोणतीही कटुता नसून एकत्रच लढणार असल्याचे माध्यमांसमोर सांगितले आहे.*

# उपोषणादरम्यान बिघडली बच्चू कडूंची प्रकृती

## आंदोलनाचा चौथा दिवस : मनोज जरांगेंनी घेतली भेट : दिव्यांगांचे मंत्रालयासमोर आंदोलन

■ **महासागर प्रतिनिधी अमरावती, दि. ११ :** प्रहार संघटनेचे अध्यक्ष आणि माजी आमदार बच्चू कडू यांचे अमरावतील अन्नत्याग आंदोलन सुरू आहे. बच्चू कडूंना समर्थन देण्यासाठी प्रहारच्या दिव्यांग कार्यकर्त्यांकडून मुंबईत मंत्रालयासमोर आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनादरम्यान, पोलिसांनी प्रहारच्या कार्यकर्त्यांना अटक केली. तिकडे मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी बच्चू कडू यांची उपोषणस्थळी भेट देत तब्येतीची काळजी घेण्याची विनंती केली. यावेळी त्यांनी बच्चू कडूंच्या मागण्या मान्य करण्याची मागणी सरकारकडे केली.

शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांसाठी बच्चू कडू यांनी अन्नत्याग आंदोलन पुकारले आहे. त्यांच्या आंदोलनाचा आजचा चौथा दिवस आहे. अन्नाचा कणही पोटात न गेल्याने बच्चू कडू यांची प्रकृती खालावली असून सुमारे ३ ते ४ किलो वजन घटले आहे. मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी आज बच्चू कडू यांची आंदोलनस्थळी भेट घेतली. यावेळी वनराईचे गिरीश गांधी उपस्थित होते.

बच्चू कडू आपल्या गोरगरीबांसाठी अनेक वर्षांपासून मोठ्या ताकदीने आणि हिमतीने संघर्ष करत आहेत. बच्चू भाऊंनी तब्येतीची काळजी घेतली पाहिजे. आंतरवालीत येऊन ते मला तब्येतीची काळजी घेण्यास सांगतात. मी इथे येऊन त्यांना तब्येतीची काळजी घेण्यास सांगतो. बच्चू भाऊंनी अन्नत्याग आंदोलनाचे माझे हत्यार उगाच घेतले. तुमचे पहिले हत्यार चांगले होते, असे मनोज जरांगे म्हणाले.

बच्चू भाऊ एकटे नाहीत. इथे प्रत्येक जण येत असेल. भाषण ठोकून जात असेल. पाठिंबा देत असतील. ही प्रथा या राज्याची अगोदर मोडली पाहिजे. प्रत्यक्ष रस्त्यावर प्रत्येकाने उतरले पाहिजे. कुठल्या बाबतीत न्याय मिळवायचा असेल, तर प्रत्यक्षात रस्त्यावर यावे लागते. आज बच्चू भाऊ आपल्यासाठी जीव द्यायला तयार असतील, तर समाजाने सगळ्या शेतकरी ताकदीने रस्त्यावर उतरले पाहिजे, असे आवाहन मनोज जरांगे यांनी केले.

तुमच्या मागण्या मान्य नाही केल्या, तर बघा आम्ही काय करतो. आम्ही सगळे तुमच्या सोबत आहोत. सरकारला सळो की पळो करून सोडतो. आमच्यात तेवढी ताकद आहे, असा इशारा मनोज जरांगे यांनी दिला.

देवेंद्र फडणवीस साहेबांनी लक्षात ठेवावे, विरोधाला विरोध करायचा अशांपैकी आम्ही नाही. मी मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना सांगतो, तुम्ही बच्चू भाऊंच्या मागण्यांची तातडीने दखल घ्या. फोनाफोनी बंद करा, अशी मागणी मनोज जरांगे यांनी यावेळी बोलताना केली.





**मंत्रालयासमोर आंदोलन**

बच्चू कडू यांच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी दिव्यांगांनी मुंबईत मंत्रालयासमोर आंदोलन केले. यावेळी पोलिसांनी आंदोलकांना ताब्यात घेतले. यावरून बच्चू कडू आक्रमक झाले आहेत. कार्यकर्त्यांना त्रास दिल्यास मुंबई गाठू, असा इशारा बच्चू कडू यांनी सरकारला दिला आहे.

**बच्चू कडूंच्या प्रमुख मागण्या**

शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी द्यावी.

दिव्यांग व विधवा महिलांना रु. ६०००/- मानधन देण्यात यावे.

आपत्कालीन संकटमुळे शेतकऱ्यांना संपूर्ण कर्ज माफ करून शेतमालाला किमान दरावर २०% अनुदान देण्यात यावे.

दिनांक ६ एप्रिल २०२३ रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तानुसार शासन निर्णय काढण्यात यावे.

वंचित घटकांना वगळता सर्व गोरगरीब समांतर राहणा?या व सन्मानजनक वागणूक हवी असलेल्या व सध्या विविध अडचणीत असलेल्या घटकांनाही सन्मानजनक घरकुल द्यावे.

शहरासारख्या ग्रामीण भागातील घरकुलासाठीही समान निकष लागू करून किमान रु. ५ लाख अनुदान घरकुल लाभार्थ्यांना देण्यात यावे.

आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना स्वतंत्र मंडळ स्थापून रु. १० लाख आर्थिक मदत व संपूर्ण कर्जमाफी द्यावी.

रोजंदारी करणाऱ्या सर्व मजुरांना एमआरईजीएस मध्ये घेण्यात यावे तसेच फळपीकांत ३:५ प्रमाण लागू करून एमआरईजीएस मध्ये जोडण्यात यावे.

दररोज होणाऱ्या श्रमाच्या बदल्यात रु. १०००/- मजुरी दिली जावी.

संजय गांधी योजनेत पात्र लाभार्थ्यांना तात्काळ संपूर्ण मंजूर रक्कम देण्यात यावी.

शेतकऱ्यांच्या मुला-मुलींना स्वतंत्र शिष्यवृत्ती योजना लागू करून उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती द्यावी.

१००% दिव्यांग व अपंग व्यक्तींना शासकीय नोकरीत ५% आरक्षण देण्यात यावे.

शासकीय नोकर भरतीत इतर मागास प्रवर्गचे आरक्षण २७% ठेवावे.

शेतमाल विमा योजनेचा लाभ थेट शेतकऱ्यांच्या खात्यावर द्यावा. विमा हप्त्याचे ५०% पेक्षा जास्त शुल्क शासनाने द्यावे.

# सरकार आणि प्रशासनात पैसे खाण्यासाठी शेतकऱ्यांचा वापर

## वडेट्टीवार यांचा गंभीर आरोप

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ११ :** गेल्या काही महिन्यात मराठवाड्यात विशेषतः जालना जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टी आणि गारपिटीने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या अनुदान वाटपात घोटाळा करून ३५ कोटी हडप केल्याचा आरोप केला जात आहे. यावरुन काँग्रेसचे नेते आमदार विजय वडेट्टीवार यांनी राज्य सरकारवर निशाणा साधला आहे.

या संदर्भात विजय वडेट्टीवार यांनी एका पोस्टच्या माध्यमातून या प्रकरणाची माहिती शेअर केली आहे. जालना जिल्ह्यातील २६ तलाठ्यांनी अतिवृष्टी आणि गारपिटीने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या अनुदान वाटपात घोटाळा करून ३५ कोटी हडप केल्याचा आरोप यात करण्यात आला आहे.

तसेच ज्या तलाठ्यांनी हा भ्रष्टाचार केला त्यांच्यावर कडक कारवाई झाली पाहिजे, या तलाठ्यांकडून वसुली करून शेतकऱ्यांचा पैसा त्यांना मिळायला हवा अशी मागणी देखील त्यांनी केली आहे.



जालना जिल्ह्यातील २६ तलाठ्यांनी अतिवृष्टी आणि गारपिटीने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या अनुदान वाटपात घोटाळा करून ३५ कोटी हडप केल्याची घटना पुढे आली आहे. सरकार आणि प्रशासनात पैसे खाण्यासाठी शेतकऱ्यांचा वापर कसा होत आहे ह्याचे हे उत्तम उदाहरण आहे. त्यांच्यावर कडक कारवाई झाली पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली आहे.

# मुख्यमंत्री कोणाचा बाप नसतो..

**पित्याने टोचले पोराचे कान**

■ **वृत्तसंस्था, धाराशिव, दि. ११ :** मुख्यमंत्री कोणाचा बाप नसतो. मी नितेशला समज दिली आहे, असे भाजप खासदार नारायण राणे यांनी म्हटले आहे.

भाजप आमदार व मंत्री नितेश राणे यांनी काही दिवसांपूर्वी धाराशिव येथे बोलताना महायुतीमध्ये भाजपचा मुख्यमंत्री सगळ्यांचा बाप आहे, असे वक्तव्य केले होते. त्यावरून महायुतीमध्ये अंतर्गत वाद पेटला होता. त्यानंतर नीलेश राणे यांनी देखील ट्विट करत नितेश राणे यांना विधाने जपून करावीत असा सल्ला दिला होता. आता नारायण राणे यांनी देखील समज दिल्याचे समजते.



नारायण राणे म्हणाले, मुख्यमंत्री कोणाचा बाप नसतो. मी नितेशला समज दिली आहे. मुख्यमंत्री हा जनतेचा सेवक असतो. कोणाचा निधी अडवणे हे चुकीचे आहे, त्याबद्दल मी सूचना देणार असल्याचे देखील राणे यांनी म्हटले आहे.

उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्यासह ९ मंत्र्यांच्या उपस्थितीत

# आज राष्ट्रवादी काँग्रेसचा संकल्प मेळावा

## माजी आमदार सानंदासह २५ हजार कार्यकर्त्यांचा प्रवेश

■ **महासागर प्रतिनिधी खामगाव, दि. ११ :** उपमुख्यमंत्री अजितदादा पवार हे गुरुवार १२ जून रोजी खामगाव शहराच्या दौऱ्यावर येत असुन अजित पवार यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या ९ मंत्र्यांच्या उपस्थितीत सायंकाळी ५ वाजता भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर परिषद मैदान येथे राष्ट्रवादी काँग्रेस कार्यकर्त्यांचा भव्य संकल्प मेळावा व पक्ष प्रवेश सोहळा संपन्न होणार आहे.




याप्रसंगी खामगाव विधानसभा मतदार संघाचे माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांच्यासह अनेक आजी-माजी जिल्हा परिषद , पंचायत समिती सदस्य, लोकप्रतिनिधी यांच्यासह बुलढाणा जिल्हयातील अनेक दिग्गज नेते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये जाहिर प्रवेश करेणार आहेत.

खामगाव विधानसभा मतदार संघात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या ११ हजार क्रियाशिल सदस्यांची नोंदणी करुन त्यांच्या नावांची यादी प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांना सुपुर्द करण्यात येणार आहे.

यावेळी खासदार प्रफुलभाई पटेल, सुनील तटकरे, छगन भुजबळ, बाबासाहेबजी पाटील, हसन मुश्रीफ, माणिकराव कोकाटे, अदिती तटकरे, पालकमंत्री मकरंद जाधव पाटील, इंद्रनील नाईक, सौ. रुपालीताई चाकणकर, संजय खोडके , अमोलजी मिटकरी,आमदार मनोज कायंदे, सुरज चव्हाण , यांच्यासह अनेक खासदार,आमदार, विधान परिषद सदस्य व प्रदेश पातळीवरील राष्ट्रवादी काँग्रेसचे मान्यवर नेते मंडळींची उपस्थिती लाभणार आहे.

शहरातील प्रमुख मार्गाने रॅली काढुन थोर महापुरुषांच्या पुतळ्यांना माल्यार्पण करुन अभिवादन करण्यात येणार आहे.

उद्यानाची भिंत कोसळली

# दोन महिला ठार

■ **वृत्तसंस्था, संभाजीनगर, दि. ११ :** छत्रपती संभाजीनगर शहरात सायंकाळी सहाच्या सुमारास धुळीचे वादळ निर्माण झाले होते. सोसाट्याच्या वाऱ्यासह धुळीचे लोट सर्वत्र पसरले होते. दरम्यान, सिद्धार्थ उद्यानातील प्रवेशद्वाराच्या भिंतीचा भाग कोसळला आणि यामध्ये दोन महिलांचा मृत्यू झाला. या दोन्ही महिला उद्यानात कर्मचारी होत्या.

पावसामुळे प्रवेशद्वाराच्या भिंतीचा काही भाग कोसळला आणि या घटनेत दोन महिलांचा जागीच मृत्यू झाला. तर, इतर ५ जण जखमी झाले आहेत. स्वाती खैरनाथ,(३५ हल्ली मुक्काम रांजणगाव मुळगाव लासलगाव), रेखा गायकवाड (वय ३८ सौभाग्य चौक एन ११ हडको) असे मयत झालेल्या महिलांची नावे आहेत.

सकाळपासूनच पावसाळी वातावरण निर्माण झाले होते. त्यात सायंकाळी वादळी वाऱ्याने शहराला घेरले होते व धुळीत संपूर्ण शहर गुडूप झाले होते. त्यातच उद्यानाची भिंत कोसळून दोन महिलांचा मृत्यू झाला .

